अस्सल सोलापुरी

सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | रविवार, दि. २ एप्रिल २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : १८३ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

लखनौचा दिल्लीवर ५० धावांनी विजय

लखनौ : मेअर्सची झंझावाती ७३ धावांची खेळी अन् मार्क वूडच्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर लखनौने आयपीएलच्या १६ व्या हंगामाची विजयी सुरुवात केली. राहुलच्या नेतृत्वातील लखनौ संघाने दिल्लीचा ५० धावांनी पराभव केला. लखनौने दिलेल्या १९४ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना दिल्लीने ९ गड्यांच्या मोबदल्यात १४३ धावांपर्यंत मजल मारली. डेविड वॉर्नर याने अर्धशतकी खेळी करत एकाकी झुंज दिली.लखनौकडून मार्क वूड याने भेदक मारा करत दिल्लीचा अर्धा संघाला तंबूत धाडले. पृथ्वी शॉ आणि डेविड वॉर्नर यांनी चार षटकात ४० धावांची विस्फोटक सलामी दिली. पण मार्क वूड याने लागोपाठ दोन चेंडूवर दोन विकेट घेत दिल्लीला बॅकफूटवर ढकलले. पृथ्वी शॉ आणि मिचेल मार्श एकापाठोपाठ एक बाद झाले. त्यानंतर दिल्लीची फलंदाजी कोसळली. लखनौकडून मार्क वूड याने सर्वाधिक पाच विकेट घेतल्या.

आयपीएल सामना क्र.०४

सनरायझर्स हैद्राबाद विरुद्ध राजस्थान रॉयल्स

वेळ : ३.३० वा.
स्थळ : हैद्राबाद

आयपीएल सामना क्र.०५

रॉयल चॅलेंजर्स बेंगलोर विरुद्ध मुंबई इंडियन्स

वेळ : ७.३० वा.
स्थळ : बेंगळुरु

जमिनी गेल्या, मोबदलाही गेला, नशिबी संताप आला

▪ ग्रीनफिल्डवरचा शेतकरी भांडून भांडून वैतागला

सुराज्य/सोलापूर

सुरत-चेन्नई प्रस्तावित महामार्गासाठी अक्कलकोट व दक्षिण सोलापूर तालुक्यातून संपादित करण्यात येणाऱ्या शेतकऱ्यांच्या जमिनीवर शासनाचा ताबा आला असून या जमिनीवरील शेतकऱ्यांचे अधिकार आता संपुष्टात आले आहेत. यासंदर्भात प्रसिध्द झालेल्या राजपत्रातून ही बाब उघडकीस आली असून बाधित शेतकऱ्यांना हातावर नुकसान भरपाई म्हणून एक पैसुध्दा टेकवला नाही. यामुळे बाधित शेतकऱ्यामध्ये संतापाची लाट उसळली आहे. याप्रकरणी उच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठावण्याचा निर्णय घेतला असल्याचे संघर्ष समितीचे बाळासाहेब मोरे यांनी 'सुराज्य'शी बोलताना सांगितले.

अक्कलकोट तालुक्यातून जात असलेल्या सुरत-चेन्नई या राष्ट्रीय महामार्गासाठीच्या भूसंपादनाची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आली आहे. यासाठी भूसंपादन विभागाच्यावतीने अधिसूचना जाहीर करून हरकती मागविण्यात आल्या होत्या. दाखल हरकती सुनावणी घेऊन निकाली काढल्या आहेत.

ज्या जमिनी प्रस्तावित राष्ट्रीय महामार्गामध्ये बाधित होणार आहेत; त्यांनी तातडीने संबंधित जमिनीबाबत असलेले हितसंबंध, मालकीचे, हक्काचे स्वरूप तसेच नुकसानभरपाई मिळण्याच्या मागणीसंबंधीचे निवेदन घेऊन पुराव्यासह १० एप्रिलपर्यंत भूसंपादन अधिकारी यांच्या कार्यालयाकडे संपर्क साधावा, अशा प्रकारच्या नोटिसाही जारी केल्या आहेत. दिलेल्या मुदतीपर्यंत जर बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांचे म्हणणे आले नाही तर संबंधितांना याबाबत काहीही म्हणायचे नाही अथवा त्यांची पुढे कोणत्याही प्रकारची हरकत असणार नाही, असे गृहीत धरून पुढील कार्यवाही करण्यात येईल असे राजपत्रात प्रसिध्द केले आहे.

शासनाच्या विरोधात हायकोर्टात

वाढीव मोबदला देण्यासंदर्भात अद्याप कोणताही निर्णय झाला नसताना अक्कलकोट तालुक्यातील सुरत-चेन्नई ग्रीनफिल्ड महामार्गासाठी संपादीत केलेल्या जमिनीवर शेतकऱ्यांचा विरोध असूनही राजपत्र जाहीर झाल्याने यावर जमिनीवर सरकार अधिकार आला आहे. या राजपत्राच्या आणि ६ ऑक्टोबर २०२१ रोजी काढलेल्या जीआरच्या विरोधात हायकोर्टात जाणार आहोत. ॲड. महादेव चौधरी यांच्या माध्यमातून प्रक्रिया चालू आहे.

– बाळासाहेब मोरे (सुरत चेन्नई ग्रीनफिल्ड संघर्ष समिती अध्यक्ष)

शेतकऱ्यांवर जबरदस्तीच केली

नुकसानभरपाई योग्य आणि अधिक प्रमाणात मिळावी यासाठी अक्कलकोट, दक्षिण सोलापूर व बार्शी तालुक्यातील शेतकऱ्यांनी विविध प्रकारची आंदोलने केली होती. जोपर्यंत योग्य मोबदला मिळत नाही, तोपर्यंत भूसंपादन होऊ देणार नाही, असा पवित्रा घेतला होता. याप्रश्नी पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी लक्ष घालून मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांकडे बैठक लावण्याचे आश्वासन दिले होते. पण हे आश्वासन हवेतच विरले आहे. नुकसानभरपाईचा महत्त्वाचा मुद्दा प्रलंबित असताना शासनाने राजपत्र प्रसिध्द करून शेतकऱ्यांवर एक प्रकारे जबरदस्तीच केली असल्याचा आरोप बाधितांनी केला आहे.

खरेदी विक्रीला निर्बंध

शासनाने शेतकऱ्यांची फसवणूक केली आहे. पालकमंत्र्यांनी जमीन संपादनाची प्रक्रिया थांबण्याचे आदेश दिले असताना महामार्गासाठी संपादीत जमिनीचे राजपत्र जाहीर झाले. संपादीत जमिनीवर शासनाचे नाव लागणार आहे. परिणामी या जमिनीची खरेदी विक्री बंद होणार आहे. यासाठी शेतकरी आक्रमक झाले आहेत. बार्शीनंतर आता अक्कलकोट तालुक्यातील शेतकरी मोठा उठाव करण्याच्या तयारीत आहेत.

टप्पा अनुदान पात्र शाळेतील ३६० शिक्षक अजूनही प्रतीक्षा यादीवर

सुराज्य/अक्कलकोट

जि. प. च्या माध्यमिक शिक्षण विभागामध्ये मागील दोन-तीन दिवसांपासून टप्पा अनुदान पात्र शाळेतील शिक्षकांचे अनुदान मंजूर करण्याची प्रक्रिया जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागांमध्ये सुरू आहे. जिल्ह्यातून आतापर्यंत जवळपास १०५३ शिक्षक या टप्पा योजनेत होते. त्यापैकी ६९५ शिक्षकांना आतापर्यंत अनुदान पात्र समावेश करण्यात आले आहे. तर उर्वरित ३६० शिक्षक अजूनही टप्पा अनुदान पात्र योजनेत प्रतीक्षा यादीवर आहेत.

प्रतीक्षा यादी ३१ मार्च पर्यंत पूर्ण करुन घेण्याचे संबंधित संस्थांच्या शिक्षकांची जबाबदारी होती. त्याकरिता ३१ मार्चची शेवटची डेटलाईन प्रशासनाकडून देण्यात आली होती. मात्र असे असतानाही अनेक संस्थांतील शिक्षकाकडून दिलेल्या प्रस्तावामध्ये अनेक गंभीर

त्रुटी आढळून आल्याने शिक्षकांना या प्रतीक्षा यादीची प्रतीक्षा करावी लागत आहे. ज्या काही शिक्षकांच्या यापूर्वी प्रस्ताव नव्हता आणि आताही प्रस्ताव नाहीत परंतु प्रतीक्षा यादीची वाट पाहत आहेत असेही काही शिक्षक आढळून आले आहेत त्यामुळे अशा शिक्षकांचा यात विचार केला जाणार नसल्याचे शिक्षणाधिकारी सुलभा वठारे यांनी सांगितले. उर्वरित शिक्षकांनी आपल्या फाईलमधील त्रुटी तातडीने पूर्ण करुन आणून शिक्षण विभागात जमा करावेत म्हणजे पुढील कार्यवाही करण्यास शिक्षक विभागास सोपे जाईल, असे आवाहन शिक्षणाधिकारी सुलभा वठारे यांनी केले आहे.

राहुल गांधी विरुद्ध आणखी एक मानहानीचा खटला

नवी दिल्ली : माजी खासदार आणि काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्याविरोधात आणखी एक मानहानीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जानेवारी महिन्यात आयोजित केलेल्या त्यांच्या भारत जोडो यात्रेदरम्यान त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ विरुद्ध केलेल्या वक्तव्याबद्दल मानहानीचा खटला दाखल करण्यात आला आहे. आरएसएस कार्यकर्ता कमल भदोरिया यांच्या तक्रारीवरून वकील अरुण भदोरिया यांनी उत्तराखंडच्या हरिद्वार न्यायालयात खटला दाखल केला आहे. या प्रकरणाची सुनावणी १२ एप्रिल रोजी होणार आहे.

वर्षभर फरार स्वाती भोसलेंचा जामीन दुसऱ्यांदा फेटाळला

सोलापूर : स्वत:च विकलेल्या फ्लॅटवर बेकायदेशीर कब्जा केल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर एक वर्षापासून फरार असलेल्या स्वाती महेंद्र भोसले या महिलेचा अटकपूर्व जामीन अर्ज सोलापूर येथील सत्र न्यायालयाने दुसऱ्यांदा फेटाळला. उच्च न्यायालय आणि सत्र न्यायालयाने जामीन फेटाळूनसुध्दा पोलीस आरोपी महिलेला अटक करत नसल्यामुळे सध्या पोलिसांच्या भूमिकेविषयीच शंका उपस्थित केली जात आहे.

स्वाती भोसले आणि महेंद्र बाबूराव भोसले यांनी विजापूर रोडवरील पनाश अपार्टमेंटमधील फ्लॅट एका शिक्षिकेला विकला होता. संबंधित शिक्षिका त्याठिकाणी सहकुटुंब राहयला आल्या होत्या. त्या बाहेरगावी गेल्याची संधी साधून भोसले पती-पत्नीने फ्लॅटचे कुलूप तोडून बेकायदेशीरपणे ताबा घेतला होता. याप्रकरणी पतीपत्नीविरूध्द विजापूर नाका पोलीस ठाण्यात गेल्या वर्षी दि. ५ फेब्रुवारी २०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यावेळी गुन्हे शाखेच्या पोलिसांनी महेंद्र भोसले यास अटक केली होती. मात्र स्वाती पोलिसांना गुंगारा देऊन फरार झाल्या होत्या. त्या दरम्यान, सोलापूरच्या सत्र न्यायालय व मुंबई उच्च न्यायालयाने स्वाती भोसले यांचा अटकपूर्व जामीन फेटाळला. त्यानंतर स्वाती भोसले यांनी दुसऱ्यांदा अटकपूर्व जामिनासाठी सोलापूरच्या सत्र न्यायालयात धाव घेतली होती. अतिरिक्त सत्र न्यायाधीश व्ही. एच.पाटवदकर यांनी त्यांचा जामीन अर्ज नुकताच फेटाळला.

आरोपी व पोलीस निरीक्षक एकाच अपार्टमेंटमध्ये

विजापूर नाका पोलीस ठाण्यात या प्रकरणाचा गुन्हा दाखल असून वरिष्ठ पोलीस निरीक्षक हनपुडे-पाटील हे पनाश अपार्टमेंटमध्ये राहतात. त्यांच्याच पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्यातील फरार आरोपी महिला भोसले या हनपुडे-पाटील राहत असलेल्या अपार्टमेंटमध्येच राहतात. हे माहिती असूनही आरोपीला अटक केली जात नाही, याबद्दल आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

अटकेसाठी टाळाटाळ

या गुन्ह्याचा तपास शहर गुन्हे शाखेकडे सोपवण्यात आला होता. तपासी अंमलदार सहाय्यक निरीक्षक महाडिक यांनी सोलापूर सत्र न्यायालय आणि मुंबई उच्च न्यायालयाने जामीन फेटाळल्यानंतरही फरार असणाऱ्या भोसले यांना अटक करण्याचे धाडस दाखवले नाही. गुन्हा दाखल होऊन एक वर्षानंतर सत्र न्यायालयाने केवळ आरोपी फरार असल्याच्या मुद्यावर जामीन फेटाळला. तरीही फरार आरोपीस अटक करण्यासंदर्भात गुन्हे शाखेकडून टाळाटाळ केली जात आहे.

आरोपी उमेश राठोड स्थानबद्ध

सोलापूर : सोलापूर शहरातील जेलरोड पोलीस ठाण्याच्या हातभट्टी दारू विक्री संबंधाने रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार उमेश नामदेव राठोड (वय-३९, रा.मुळेगाव तांडा) याला दि.१० मार्च २०२३ रोजी स्थानबद्ध आदेश निर्गमित करून काल स्थानबद्ध केले आहे.

उमेश राठोड हा त्याच्या साथीदारांसह स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी जेलरोड पोलीस ठाण्याच्या हद्दीत गेल्या अनेक वर्षापासून अवैद्य गावठी हातभट्टी दारूच्या व्यवसाय करत होता. त्याच्यावर एकूण वीस गुन्हे दाखल आहेत.राठोड याने लोकांना त्याच्या साथीदारांसह उघडपणे शस्त्रासह मारहाण करणे,अशा प्रकारची गुन्हेगारी कारवाई करून परिसरात दहशत निर्माण करून सार्वजनिक सुव्यवस्थेत बाधा निर्माण केली आहे.

त्याच्या गुन्हेगारी कृत्यास वेळीच प्रतिबंध करण्यासाठी पोलीस आयुक्तांनी त्यास स्थानबद्धतेचे आदेश निर्गमित केले आहेत. ही कारवाई पोलीस उपनिरीक्षक विर्शेद्रसिंग बायस व विशेषता एमपीडीए पथकातील अंमलदार पोलीस हेडकॉन्स्टेबल विनायक संगमवार,सुदीप शिंदे, अक्षय जाधव,विशाल नवले यांनी ही कामगिरी पार पाडली आहे.

कुरनूर धरणातून १२०० क्युसेकने पाणी सोडले

▸ नदीकाठच्या गावांचा प्रश्न मिटला

सुराज्य/अक्कलकोट

उन्हाळी हंगाम तसेच पिण्याच्या पाण्यासाठी कुरनूर धरणातून शनिवारी सायंकाळी सहा वाजता तीन दरवाज्यातून १२०० क्युसेकने पाणी सोडण्यात आले. यामुळे अक्कलकोट, दुधनी, मैंदर्गीसह नदीकाठच्या गावांचा पाण्याचा प्रश्न मिटला आहे.

पाटबंधारे विभागाचे उपविभागीय अधिकारी प्रकाश बाबा आणि शाखा अभियंता नितीन चव्हाण यांच्या उपस्थितीत पाणी सोडण्यात आले. धरणाच्या कालवा सल्लागार समितीच्या ७ जानेवारी २०२३ रोजी झालेल्या

बैठकीत आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्या उपस्थितीत यावर्षी दोन वेळा पाणी सोडण्याचे नियोजन ठरले होते. त्यानुसार दुसऱ्या टप्प्यातील पाणी सोडण्यास शनिवारी सायंकाळी प्रारंभ झाला. रविवारी दुपारपर्यंत धरणाचे तीन दरवाजे उघडे राहतील. साधारण दोन इंचाने तीन दरवाजे उघडण्यात आले असून कुरनूर धरणाखाली आठ कोल्हापुरी बंधारे आहेत. हे आठही बंधारे अडीच मीटर पाण्याने भरून घेण्यात येणार आहेत. यामुळे धरणातील २० टक्के पाणी वापरला जाणार आहे.धरणात २० टक्के पाठीसाठा शिल्लक राहील.सध्या एप्रिल महिना सुरू आहे.मे आणि जून हे दोन महिने अजून बाकी आहेत धरणामध्ये सध्या ४० टक्के पाणीसाठा आहे. त्यामुळे पाणी काटकसरीने वापरण्याचे आवाहन पाटबंधारे विभागाने केले आहे.

दोन दिवसात सर्व बंधारे भरणार

सांगवी, अक्कलकोट, निमगाव, मिरजगी, सातनदुधनी, संगोगी, रुद्धेवाडी,बबलाद हे बंधारे रविपर्यंत भरतील. सांगवी बंधाऱ्यापर्यंत पाणी पोचले आहे. सर्व बंधारे भरण्यास दोन दिवसाचा कालावधी लागणार आहे.

शनिवारी सहा वाजता सोडले. आठ वाजेपर्यंत पाणी मोट्याळ पास झाले. रविवारी १२ वाजेपर्यंत बंधारे भरून होतील, असे उपविभागीय अधिकारी प्रकाश बाबा यांनी सांगितले.

तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



पाणी आलंय असं कुणी तरी एप्रिल फूल केलंय !

कल्याण
145-07-160

आज पंढरीत चैत्र यात्रेचा सोहळा रंगणार

२ लाख भाविक दाखल; ६५ एकर परिसर गर्दीने फुलला

सुराज्य/पंढरपूर

चैत्र यात्रेचा सोहळा व शनिवार रविवार या सलग सुट्ट्यांमुळे पंढरीत लाखोंच्या संख्येने भाविकांचे आगमन झाले आहे. श्री विठ्ठल मंदिर परिसर, प्रदक्षिणामार्ग चंद्रभागा नदीचे वाळवंट व ६५ एकर परिसर भाविकांच्या गर्दीने फुलून गेला आहे. शनिवारी विठ्ठलाच्या दर्शनाची रांग गोपाळपूर रस्त्यालगतच्या तीन नंबरच्या पत्रा शेडपर्यंत गेली होती. श्रींच्या दर्शनासाठी पाच तास लागत होते.

चैत्री यात्रा एकादशीचा मुख्य सोहळा रविवारी साजरा होत आहे. उजनी धरणातून भीमा नदीमध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी सोडण्यात आल्यामुळे चंद्रभागा नदी तुडुंब भरून वाहत आहे. त्यामुळे भाविकांना स्नानासाठी नदीमध्ये पुरेस पाणी आहे. विठ्ठल मंदिर समितीच्या वतीने चालवण्यात येत असलेल्या मोफत अन्नछत्राचा लाभ लाखो भाविक घेत आहेत. नुकतेच मंदिर समितीने भाविकांसाठी रात्री देखील भोजन उपलब्ध करून दिले आहे. चैत्री यात्रेसाठी चंद्रभागा नदी तीरावरील ६५ एकर परिसरामध्ये राज्याच्या विविध भागातून भाविकांच्या दिंड्या दाखल झाल्या आहेत.

चैत्री यात्रेदरम्यान सुमारे दोन लाख भाविक ६५ एकर परिसरात मुक्कामास येतील असे गृहीत धरून पंढरपूर नगर परिषद व महसूल प्रशासनाने भाविकांसाठी विविध सोयी सुविधा उपलब्ध केल्या आहेत. चंद्रभागा नदीत कावडीला स्नान घालून महाद्वार परिसरातील नामदेव पायरीचे दर्शन घेत असल्याचे दिसून आले. शिखर शिंगणापूरची यात्रा व चैत्री एकादशीचा योग साधण्यासाठी काही दिंडीकरी ६५ एकर मध्ये दाखल झाले आहेत.

महिला भाविकांची संख्या वाढली

राज्य शासनाने नुकतेच महिलांना एसटी प्रवासात ५० टक्के सवलत दिली आहे. त्यामुळे चैत्री यात्रेसाठी महिला भाविकांची संख्या वाढली आहे. या पार्श्वभूमीवर महिला भाविकांसाठी योग्य ते नियोजन करण्यात आले आहे अशी माहिती पंढरपूर आगाराकडून देण्यात आली.

६५ एकर परिसरामध्ये आपत्कालीन कक्ष

६५ एकर परिसरामध्ये भाविकांसाठी एक आपत्कालीन कक्ष सुरू करण्यात आला असून चैत्री यात्रेसाठी आलेल्या दिंडीतील भाविकांना निवासासाठी प्लॉटचे वाटप करण्यात येत आहे. पंढरपूर नगरपरिषद व महसूल प्रशासनाच्या वतीने २४ तास पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, वैद्यकीय सेवा, वीजपुरवठा आदी सुविधा पुरविण्यात येत आहेत.

शिंगणापूरहुन भाविक पंढरीत दाखल

चैत्री यात्रेचा सोहळा रविवारी संपन्न होत आहे. तर शिखर शिंगणापूरची यात्रा शनिवारी संपन्न झाली. राज्यभरातून भाविक शिखर शिंगणापूरला दर्शनासाठी आले होते. आता बहुतांश भाविक शंभू महादेवाची कावड खांद्यावर घेऊन पंढरीत दाखल होत आहेत.

पंजाब किंग्जची विजयी सुरुवात केकेआवर सात धावांनी मात

✔ कोलकाता

आयपीएल २०२३ च्या पहिल्याच सामन्यात पंजाबने कोलकात्याचा सात धावांनी पराभव केला आहे. डकवर्थ लुईस नियमांनुसार पंजाबने कोलकतात्याचा सात धावांनी पराभव केला.

पंजाबने दिलेल्या १९२ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना कोलकाता संघ सन्मानजक धावसंख्यापर्यंत पोहचला होता. पण चार षटके बाकी असताना पाऊसाने हजेरी लावली. त्यामुळेच डकवर्थ लुईस नियमांनुसार पंजाबला सात धावांनी विजय देण्यात आले. भानुका राजपक्षे आणि अर्शदीप सिंह पंजाबच्या विजयाचे शिल्पकार ठरले. भानुका राजपक्षे याने अर्धशतक झळकावले तर गोलंदाजीत अर्शदीपने तीन विकेट घेतल्या.

पंजाबने दिलेल्या १९२ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना कोलकात्याची सुरुवात खराब झाली. कोलकात्याने नियमीत अंतराने विकेट गमावल्या. मनदीप सिंह, अनुकूल रॉय आणि रिंकू सिंह यांना दुहेरी संख्याही गाठता आली नाही. गुरबाज याने सलामीला फटकेबाजी केली. पण त्याला मोठी धावसंख्या उभारता आली नाही. गुरबाज २२ धावा काढून बाद झाला. इम्पॅक्ट प्लेअर म्हणून मैदानात उतरलेल्या वेंकटेश अय्यरने ३४ धावांचे योगदान दिलेय. वेंकटेश अय्यरने २८ चेंडूत ३४ धावा केल्या. या खेळीत त्याने एक षटकार आणि तीन चौकार लगावले. कर्णधार नीतीश राणा यानेही २४ धावांचे योगदान दिलेय. राणाने १७ चेंडूत एक षटकार आणि तीन चौकारांच्या मदतीने ३४ धावा केल्या. कोलकात्याकडून अष्टपैलू आंद्रे रसेल याने सर्वाधिक ३५ धावांचे योगदान दिलेय. रसेल याने १९ चेंडूत दोन षटकार आणि तीन चौकारांच्या मदतीने ३५ धावा केल्या. शार्दूल ठाकूर ७ तर सुनील नारायण ७ धावांवर नाबाद राहिले. पंजाबकडून अर्शदीप याने भेदक मारा केली. अर्शदीप याने तीन षटकात १९ धावांच्या मोबदल्यात तीन विकेट घेतल्या. अर्शदीप याने सुरुवातीलाच कोलकात्याला तीन धक्के दिले. अर्शदीप याने मनदीप सिंह, अनुकुल रॉय यांना बाद करत पंजाबला दणक्यात सुरुवात करुन दिली. त्यानंतर जम बसलेल्या वेंकटेश अय्यरचाही अडथळा त्याने दूर केला. सॅम करन, नॅथन इलीस, सिकंदर रजा आणि राहुल चहर यांनी प्रत्येकी एक एक विकेट घेतली. त्याआधी नाणेफेकीचा कौल गमावल्यानंतर पंजाब संघाने निर्धारित २० षटकात १९१ धावांचा डोंगर उभारला. भानुका राजपक्षेचे अर्धशतक आणि सॅम करनच्या फिनिशिंगमुळे पंजाब किंग्सने १९१ धावांपर्यंत मजल मारली. कोलकात्याकडून टीम साऊदीने सर्वाधिक दोन विकेट घेतल्या. टीम साऊदीने सर्वाधिक विकेट घेतल्या पण तो सर्वात महागडा गोलंदाज ठरला. चार षटकात साऊदीने ५४ धावा खर्च केल्या. त्याशिवाय सुनील नारायण याने ४० तर शार्दुल ठाकूर याने ४३ धावा खर्च केल्या. साऊदीने सर्वाधिक दोन विकेट घेतल्या. मेश यादव, नारायण आणि वरुण चक्रवर्ती यांना प्रत्येकी एक विकेट मिळाली.

भानुका राजपक्षेचा अर्धशतकी तडाखा

भानुका राजपक्षे याने कोलकाताच्या गोलंदाजांची चांगलीच धुलाई केली. राजपक्षे याने अवघ्या ३२ चेंडूत ५० धावा केल्या. या खेळीदरम्यान त्याने दोन षटकार आणि ५ चौकार लगावले. राजपक्षे याने कर्णधार शिखर धवनसोबत ८० पेक्षा जास्त धावांची भागिदारी केली.

सेतू केंद्र बंद केल्यामुळे जनतेची आणि विद्यार्थ्यांची गैरसोय

दलाल, एजंटाचा सुळसुळाट वाढणार

✔ सुराज्य/सोलापूर

सोलापूर शहर व जिल्ह्यातील सेतू सुविधा केंद्र चालविण्याचा देण्यात आलेल्या ठेक्याची मुदत संपली आहे. त्यामुळे हे सेतू केंद्र बंद करण्याचे आदेश जिल्हा प्रशासनाच्या वतीने काढण्यात आले आहेत. सेतू केंद्रात मोठी यंत्रणा असल्यामुळे एकाच छताखाली सर्व दाखल कमी वेळेत आणि कमी नाममात्र शुल्क घेऊन मिळत होते. आता मात्र हे केंद्र बंद केल्यामुळे मोठी गैरसोय नागरीक व विद्यार्थ्यांची होणार आहे. तर महाईसेवा केंद्रावर कोणाचे नियंत्रण नसल्यामुळे दलाल एजंटाचा सुळसुळाट होऊन आर्थिक लूटीला बळ मिळण्याची शक्यता आहे.

राज्यातील सर्व सेतू केंद्राची मुदत ३१ मार्च २०२३ रोजी संपुष्टात आली आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयात आणि प्रत्येक तहसील कार्यालयात असलेले सेतू केंद्र बंद करण्यात आली आहेत. वास्तविक पाहता सेतू कार्यालयात मोठी यंत्रणा कार्यरत आहे. वेगवेगळे दाखले देण्यासाठी वेगळ्या खिडक्यांची सोय असल्याने एकावेळी अनेक दाखले मिळत असल्याने नागरिकांची आणि जनतेची मोठी सोय व्हायची. थेट जिल्हाअधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली हे सेतू केंद्र असल्याने कमी वेळेत हे दाखल मिळत असत मात्र आता ही सेतू केंद्र बंद केल्याने मोठी जनतेची मोठी गैरसोय होणार आहे. परीक्षा कालावधित लागणारे, महाविद्यालय प्रवेश प्रक्रियेसाठी लागणारे उत्पन्नाचे दाखले, जातीचे दाखले, यासह विविध दाखले एकाच छता खाली मिळत असल्याने सेतू सुविधा फायदेशिर होती. मात्र यासाठी नागरिकांना महाईसेवा केंद्रावर हेलपाटे मारावे लागणार आहेत. मात्र यापुढे नागरिकांनी आपल्या रहिवाशी भागात कार्यरत असलेल्या आपले सरकार सेवा केंद्र (महा ई सेवा केंद्र) मार्फत विविध दाखले व सेवा सुविधांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. या महाईसेवा केंद्रातून जादा पैसे घेतले जात असल्याच्या तक्रारी आहेत. प्रत्येक सेतू केंद्रामध्ये दहा ते १५ खिडक्या असतात. तर या केंद्रामध्ये २० ते २५ कर्मचारी सेवा देत असतात यामध्ये महिला कर्मचाऱ्यांची संख्या मोठी आहे. कमी मानधनावर हे कर्मचारी काम करत असतात. आता सेतू केंद्र बंद झाल्यामुळे हजारो कर्मचारी बेकार झाले असून यांच्या परिवारावर उपासमाळीची वेळ आली आहे.

माजी महापौर महेश(अण्णा) कोठे यांच्या वाढदिवसानिमित्त जय हो परिवाराच्यावतीने त्यांना पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा देण्यात आल्या. याप्रसंगी माजी परिवहन समिती सभापती विजयकुमार हत्तुरे, काँग्रेसचे नेते राधाकृष्ण पाटील, पत्रकार विजयकुमार उघडे, आबा जानराव, प्रशांत बनसोडे, संतोष शेरला व जय हो मित्र परिवार.

नाझरे परिसरात माठ, विक्रीसाठी उपलब्ध

✔ सुराज्य/नाझरे

सध्या नाझरे व परिसरात कडक उन्हाने अंगाची लाहीलाही होताना दिसत आहे. त्यामुळे यांचा आठवडा बाजारावर ही परिणाम झाला आहे. रखरखत्या उन्हात घशाला कोरड पडत असल्याने येथील नागरिकांची गरिबांच्या फ्रिजची मागणी वाढत असून, लोक माठ (डेरा) खरेदी करत असल्याचे दिसत आहे.

शिमगा संपला की उन्हाचा ताव सुरू होतो व दिवसेंदिवस उन्हाचा पारा वाढत असल्याने यशाची कोरड थांबवण्यासाठी सर्वसामान्य नागरिक थंड पाणी पिण्यासाठी माठांचा वापर करीत आहेत व नागरिकांची ही गरज लक्षात येऊन कुंभार वाड्यात डेरे तयार करण्यावर जास्तीत जास्त भर देत असल्याचे दिसत आहे.

उन्हाळ्याच्या या दिवसात गारवा मिळावा म्हणून विविध कंपन्यांचे फ्रिज सध्या उपलब्ध असून त्याच्या किमती गोरगरीब नागरिकांना परवडणाऱ्या नाहीत त्यामुळे कुटुंबाला गार पाणी मिळावे व तहान भागावी म्हणून गरीबाचा फ्रिज म्हणून डेऱ्यास मागणी वाढली आहे.

सध्या डेरा तयार करण्यासाठी माती मिळत नाही त्यातच आमच्या कुटुंबाचा हा पिढ्यान्पिढ्या कुंभार कामाचा व्यवसाय व यातूनच उदरनिर्वाह करायचा म्हणून मी कुटुंबीय गेल्या पाच महिन्यांपासून माठ तयार करीत आहोत. लहान मोठे माठ सर्वजण मिळून आम्ही तयार करीत आहोत. सध्या तरी गरिबांची फ्रिज म्हणून प्रसिध्द असलेल्या माठाला प्रचंड मागणी वाढली आहे, असे सुधाकर कुंभार यांनी सांगितले.

फेब्रुवारीच्या पंधरवड्यातील ऊसबिल खात्यावर जमा

▶ अध्यक्ष पाटील यांची माहिती

✔ सुराज्य/मंगळवेढा

श्री संत दामाजी साखर कारखान्याच्या चालू गळीत हंगामातील १ ते २१ फेब्रुवारीपर्यंत शेवटच्या पंधरवड्याचे ऊसबील प्रति टन २३०० प्रमाणे ऊस पुरवठा शेतकऱ्यांची मागणी व सोयीनुसार बँकामधील खात्यावर वर्ग केले असून कारखान्याचे शेती विभागाने दिलेली ऊस बिलाची पावती घेवून ऊस बिलाची रक्कम बँकेतून घ्यावी, असे आवाहन अध्यक्ष शिवानंद पाटील यांनी केले.

अध्यक्ष पाटील म्हणाले की, 'तीन लाख रूपये शिलकीवर आमचे संचालक मंडळ सत्तेवर आल्यापासून पहिलाच हंगाम संपन्न झाला. व्यवस्थापकीय खर्च, जाहिरात, डिझेल, भत्ता अशा आर्थिक बाबींचा या खर्चावर नियंत्रण ठेवून सभासद व कामगार केंद्रबिंदू मानून काम केले. सभासद व कर्मचाऱ्यांनी संचालक मंडळावर विश्वास ठेवून ऊस पुरवठा केल्याने कारखाना दीडपट क्षमतेने चालविला. हंगामात ३ लाख ८२ हजार ३८१ मे. टन ऊस गाळप करुन ३ लाख ९६ हजार ८०० क्विंटल पोती साखरेचे उत्पादन केले. सरासरी साखर उतारा १०.३८ मिळाला. सभासदांच्या विश्वासास पात्र राहून ऊस बिले, तोडणी ठेकेदारांची बिले, कामगार पगार वेळेवर देण्याचा प्रयत्न केला. पदभार घेतल्यानंतर जाहीर केल्याप्रमाणे गळीतास आलेल्या अखेरच्या पंधरवड्याच्या शेवटच्या टनापर्यंतचे ऊस बिल वेळेपूर्वी संबंधित बँकेत जमा केले.

याप्रसंगी उपाध्यक्ष तानाजी खरात, संचालक मुरलीधर दत्तू, गौरीशंकर बुरकुल, गोपाळ भगरे, राजेंद्र पाटील, भारत बेदरे, दयानंद सोनगे, औदुंबर वाडदेकर, रेवणसिध्द लिगाडे, भिवा दोलतडे, तानाजी काकडे, सुरेश कोळेकर व सर्व खातेप्रमुख उपस्थित होते.

सेवानिवृत्तीनिमित्त पालिका कर्मचारी आशाबाई गोरसे यांचा सत्कार

✔ सुराज्य/सोलापूर : महानगरपालिका विभागीय क्रमांक ७ प्रभाग २६ मधीन झाडूवाली कर्मचारी आशाबाई गोरसे यांच्या सेवानिवृत्ती निमित्ताने प्रभाग कर्मचाऱ्यांच्या वतीने निरोप समारंभ सत्कार आयोजित केला होता. या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती डॉ. बाबासाहेब आंबेडकर ट्रेड युनियनचे अध्यक्ष कामगार नेते बापूसाहेब सदाफुले, आरोग्य निरीक्षक प्रभाकर पांढरे, जमादार सुनील कांबळे, गौतम नागटिळक यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी महिला कर्मचारी रंजना गायकवाड, साधना सुरवसे यांच्या हस्ते प्रभागाच्यावतीने गोरसे यांना आहेर करण्यात आला. यावेळी जमादार रवी कांबळे, नाईकवाडी, अंबादास सरवदे, गौतम कांबळे, ट्रेड युनियनचे पदाधिकारी व महिला कर्मचारी उपस्थित होते.

सांगोला मतदारसंघातील विकास कामांना ७ कोटी रुपये मंजूर

आमदार शहाजीबापू पाटील यांची माहिती

✔ सुराज्य/सांगोला

महाराष्ट्र राज्याचे ग्रामविकासमंत्री गिरीश महाजन यांच्याकडे मागणी केल्याप्रमाणे सन २०२२-२३ या आर्थिक वर्षातून सांगोला विधानसभा मतदार संघासाठी गावांतर्गत मूलभूत सुविधा पुरविणे साठी महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाकडून लेखाशिर्ष २५१५ अंतर्गत ७ कोटी रुपये निधी मंजूर झाला असल्याची माहिती आमदार शहाजीबापू पाटील यांनी दिली.

सांगोला विधानसभा मतदारसंघातील विविध गावातील गावांतर्गत रस्ते रस्तावरील ओढ्यावरील पुल, सभामंडप कामे, स्मशानभूमी दुरुस्ती, पेव्हिंग ब्लॉक अशी विविध प्रकारची कामे यामधून होणार असल्याने ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा मजबूत होणार आहे व ग्रामीण नागरिकांना सोयीचे होणार आहे. या कामांचे अंदाजपत्रके तयारीचे काम चालू असल्याचे आ. पाटील यांनी सांगितले.

श्रीरामनवमी निमित्त वृक्षारोपण

✔ सुराज्य/सोलापूर

श्रीरामनवमीनिमित्त श्री साईबाबा मंदिर होटगी व नवोदय नगर, मजरेवाडी येथे बालाजी अमाईन्स लि. श्री सिध्देश्वर फाऊंडेशनच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपण करण्यात आले. औदुंबर, वड, पिंपळ अशा १०५ वृक्षांचे संगोपन करण्याचा निर्धार साईबाबा संस्थान आणि नवोदय नगरवासियांनी केला. यावेळी चंद्रभूषण रेड्डी, दत्तप्रसाद सांजेकर, श्री सिध्देश्वर फाऊंडेशनचे अध्यक्ष सिध्दार्थ सर्जे, उपाध्यक्ष गुरूशांत रामपुरे, श्री साईबाबा संस्थानचे ट्रस्टी कवीसागर, परशुराम लांबतुरे, नेताजी ताकमोगे, प्रचंडे, गंगाधर चिवडशेट्टी, सिध्दाराम म्हेत्रे यांच्यासह नवोदय नगरचे रहिवासी व साईभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विनाइंटरनेट चालणाऱ्या ऑफलाइन डिजिटल लायब्ररीचे उद्घाटन

संदीप फाऊंडेशनचा अनोखा उपक्रम

✔ सुराज्य/सोलापूर

चक्क विना इंटरनेट चालणाऱ्या ऑफलाईन डिजिटल लायब्ररीचे उद्घाटन माजी पालकमंत्री आ. विजयकुमार देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले.

संदीप फाऊंडेशनतर्फे बुधवार पेठ येथील साठे चाळ येथे हा उपक्रम झाला. यावेळी व्यासपीठावर माजी पालकमंत्री आ. विजयकुमार देशमुख, भाजपचे शहराध्यक्ष विक्रम देशमुख, नगरसेवक स्वाती आवळे, समाधान आवळे, राजाभाऊ आलुरे, भारतीय जनता युवा मोर्चाचे शहराध्यक्ष गणेश साखरे, अमोल झाडगे, आनंद भवर दिनकर जगदाळे, बबन सैंदाणे, मगदूम सर, राहुल दहीहंडे, संयोजक संदीप दुगाणे, इंडियाना एनसायक्लोपीडिया कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक रिमित जैन, रणजीत कोकाटे, शिरीष सुरवसे, लोकेश इरकशेट्टी, निखिल जाधव उपस्थित होते.

सध्या बहुतांश वेळा विद्यार्थ्यांना मोबाईलद्वारे अभ्यासक्रम शिकवला जात आहे. त्यामुळे मोबाईलला इंटरनेटची जोड असणे आवश्यक आहे. मात्र, इंडियाना एन्सायक्लोपिडिया कंपनीद्वारे तयार करण्यात आलेली ऑफलाईन एज्युकेशन वाय-फाय सिस्टिम बुधवार पेठ येथील साठे चाळ बसविण्यात आल्यामुळे विद्यार्थ्यांना विनाइंटरनेटदेखील पहिली ते दहावीपर्यंतचा अभ्यास मोबाईलद्वारे करता येणार आहे, असे संदीप दुगाणे यांनी सांगितले. कोरोनाकाळात लावण्यात आलेल्या लॉकडाऊनपासून ऑनलाईन शिक्षणाचे प्रमाण वाढले आहे. अशावेळी गोरगरीब विद्यार्थ्यांना इंटरनेटचा खर्च वाचवून संपूर्ण अभ्यासक्रम डिजिटलपध्दतीने करता यावा यासाठी संदीप फाऊंडेशनने राबवलेला हा उपक्रम कौतुकास्पद आहे, असे माजी पालकमंत्री आ. विजयकुमार देशमुख यांनी यावेळी म्हणाले.

याप्रसंगी करण दुगाणे, समर्थ लंगोटे, ओंकार चराटे, सुष्टी ढेपे, नागेश कोकरे यांची प्रमुख उपस्थिती होती. रिमीत जैन यांनी प्रास्ताविक केले. मंगेश लामकाने यांनी सूत्रसंचालन तर संयोजक संदीप दुगाणे यांनी आभार प्रदर्शन केले.

कोरोना संसर्ग रोखण्यासाठी काळजी घ्या: जि.प.चे आवाहन

✔ सुराज्य/सोलापूर

देशाच्या राजधानीसह महाराष्ट्रातही मुंबईसह काही शहरांमध्ये कोरोनाचे नवीन रुग्ण आढळून येत आहेत. त्यादृष्टीने राज्य शासनाच्या आरोग्य विभागाने सर्व जिल्ह्यांना परिस्थिती हाताळण्यासाठी पूर्व उपाययोजना करण्याचे निर्देश दिलेले आहेत. सर्वांनी कोरोना संसर्ग रोखण्यासाठी काळजी घ्यावी, नियमित मास्क वापरावे, असे आवाहन जि. प. चे आरोग्य अधिकारी डॉ. सोनिया बागडे यांनी केले आहे.

सोलापूर जिल्ह्यात सध्यातरी ग्रामीण भागात तुरळक रुग्ण आढळून येत आहेत. परंतु, कर्नाटक व आंध्रप्रदेशच्या सीमावरच्या धर्तीवर असल्याने संसर्गाची स्थिती लक्षात घेऊन जिल्हा परिषद आरोग्य विभाग ॲक्शन मोडवर आहे. कोरोनाचा संसर्ग होऊ नये यासाठी गावागावात शिबिरे घेऊन नागरिकांना बूस्टर डोस देण्याचे नियोजन करत आहे.

कोरोना रुग्णाची २० संख्या ग्रामीण भागामध्ये आहे. तरीसुद्धा आरोग्य यंत्रणेमार्फत सतर्कता वाढली जात आहे. राज्य शासनाकडून जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणेला याबाबत निर्देश मिळाले आहेत. त्यानुसार जिल्हा परिषदे चा आरोग्य विभाग सतर्क झाला आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सोनिया बागडे यांनी तालुका आरोग्य अधिकारी यांच्या ऑनलाईन बैठका घेऊन आवश्यक सतर्कता बाळगण्याची सूचना केली आहे.

सोलापूर जिल्ह्यात वाढू नये यासाठी संशयित रुग्णाची तपासणी करण्यावर भर दिला जाणार आहे, असे डॉ. बागडे यांनी सांगितले.

गावागावात बुस्टर डोस देण्याचे नियोजन

जिल्ह्यात सध्या कोरोनाचे २० बाधित रुग्ण आहेत. तरीसुद्धा अन्य शहरातील संसर्गाची स्थिती लक्षात घेऊन आरोग्य विभाग विभाग सतर्क आहे. तालुकानिहाय गावागावात बुस्टर रोज देण्यासाठी शिबिराचे नियोजन आहे. आवश्यकतेनुसार लस मागणी करण्यात येणार आहे, असे डॉ. सोनिया बागडे यांनी सांगितले.

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R.N.I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail.com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

अक्कलकोट बाजार समितीसाठी ३९; दुधनीसाठी ३२ अर्ज दाखल

सुराज्य/अक्कलकोट

अक्कलकोट व दुधनी बाजार समितीसाठी ३१ मार्च अखेर ७१ अर्ज दाखल झाले.अक्कलकोट कृषी उत्पन्न बाजार समिती साठी ३९ व दुधनी कृषी उत्पन्न बाजार समिती साठी ३२ असे दोन्ही मिळून ७१ अर्ज दाखल झाले आहेत. निवडणूक बिनविरोध होणार की लागतील याकडे तालुकावासियांचे लक्ष लागले आहे. अक्कलकोट आणि दुधनी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकांची घोषणा झाल्याने या २७ मार्च ते ३ एप्रिल २०२३ पर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करावयाचे असून २८ एप्रिलला मतदान होणार आहे. ५ एप्रिल रोजी अर्जांची छाननी होणार असून ६ एप्रिल रोजी यादी प्रसिद्ध केली जाणार आहा. ६ एप्रिल ते २० एप्रिल पर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेतले जाणार आहेत. २१ एप्रिलला उमेदवारांना चिन्ह वाटप केले जाईल आणि २८ एप्रिलला मतदान होणार आहे. त्यानंतर तीन दिवसांनी मतमोजणी होईल. यामध्ये विकास सोसायटीच्या माध्यमातून ११ संचालक, ग्रामपंचायत मधून ४ संचालक, आडत व्यापारातून २ संचालक, तर हमाल तोलार गटातून १ संचालक निवडला जाणार आहे.

अक्कलकोट बाजार समिती निवडणूकींसाठी एकूण ५९ सोसायटीचे ७७९ सभासद मतदान करणार आहेत. ७८ ग्रामपंचायत करिता ७०७ मतदार मतदान करतील व व्यापारी १३९ मतदार तर हमाल ६९ मतदार असे एकूण १६६३ मतदार आहेत.

दुधनी बाजार समिती निवडणूकींसाठी एकूण ११९८ मतदार आहेत. दुधनी सोसायटी ३० करिता ३८९ मतदार ग्रा.पं साठी ३९ साठी ३४८ मतदार आपले मतदानाचा हक्क बजविणार आहे. व हमाल, तोलार २४५ व व्यापारी २१६ मतदार आहेत. अक्कलकोट बाजार समितीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून अमर झाल्टे तर दुधनी साठी प्रकाश नलवार हे काम करत आहेत.

दुधनी साठी १)सहकारी संस्था- पाटील मल्लिकार्जुन, पाटील राजश्री, पाटील विजयालक्ष्मी, म्हेत्रे प्रथमेश (दोन अर्ज), हौदे राजेंद्र, येळमेली महादेव, ढंगापुरे अशोक, बंडगर सुनिल, पुजारी म्हाळपा,नदाफ हुसेनी, दुर्गा मल्लुम्मा म्हेत्रे शंकर, ननवरे अनिता, राठोड मोतीराम (दोन अर्ज),परमशेट्टी सातलिंगप्पा, बाके सिध्दाराम, कोगनुर विश्वनाथ, लकाबशेट्टी राजकुमार, पाटील हणमंत, जानकर महेश, आंदेवाडी गोपाल, पुजारी निंगण्णा, ग्रामपंचायत मतदारसंघ- शिवानंद पाटील, रमेश पाटील, म्हाळप्पा पुजारी, मल्लिनाथ बिराजदार, लक्ष्मीपुत्र बिराजदार, शाणप्पा करवीर, सिध्दणा पुजारी, सिध्देश्वर गंगोडा (एकुण ३२ अर्ज दाखल) अक्कलकोट साठी सहकारी संस्था बाबासाहेब पाटील, सिद्रामप्पा पाटील, धोंडप्पा बिराजदार, शिवमंगल बिराजदार, राजेंद्र बंदीछोडे, शरणबसाप्पा बिराजदार दोन अर्ज, रेवणप्पा मडिखांबे, प्रकाश कुंभार, बसवराज तानवडे, कपील शिंदे, मल्लिकार्जुन पाटील, विनित पाटील, सुमीत बिराजदार, रवीकिरण वरनाळे, बाबुराव करपे, विठ्ठल विजापूरे, रामगोंडा बाके, बसवराज पाटील, विमल गव्हाणे, विठाबाई कलकुटगे, प्रकाश कुंभार, अशपाक अगसापूरे, शिवशरण काळे, इरण्णा पुजारी, अविराज सिध्दे, शेकप्पा कलकुटगे, ग्रामपंचायत मतदारसंघ विमल गव्हाणे, कार्तिक पाटील, निरंजन हेगडे, सिध्दार्थ गायकवाड, राहुल रूही, प्रकाश बिराजदार, लक्ष्मीबाई पोमाजी, निजमोद्दीन बिराजदार, संजय देशमुख अर्ज, शिवाप्पा कुंभार, राजअहमद मुल्ला यांनी उमेदवारी दाखल केली आहे.

अक्कलकोट बाजार समितीसाठी नवीन समीकरण

अक्कलकोट बाजार समितीसाठी सर्वपक्षीय तरूण माजी सभापती मल्लिकार्जुन पाटील, युवा नेता चेअरमन दत्ता शिंदे, माजी जिल्हा परिषद सदस्य आनंद तानवडे आदींनी एकत्र येत नवीन समीकरण बनले आहे. माजी आमदारंसह माजी जि.प. सदस्य, सभापती, माजी बाजार समिती सभापतींचे अर्ज दाखल झाल्याने चुरस वाढली आहे.

राहुल गांधी यांच्यावरील कारवाई सुडबुद्धीने

▸ दादासाहेब साठे यांचा आरोप

सुराज्य/माढा

देशाची लोकशाही आणि संविधान वाचवण्यासाठीची लढाई काँग्रेस पक्ष जनतेच्या दरबारात लढणार आहे. राहुल गांधी यांच्यावरील कारवाई सुडबुद्धीने करण्यात आली आहे, मात्र ही लढाई पक्ष जिंकेल, असा आशावाद दादासाहेब साठे यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केला.

खासदार राहुलजी गांधी यांच्यावर सुडबुद्धीने करण्यात आलेल्या कारवाई नंतर याची पार्श्वभूमी आणि कारणे सत्यता लोकापर्यंत पोहचवण्यासाठी अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या निर्देशानुसार तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने शनिवारी माढ्यातील काँग्रेस कार्यालयात पत्रकार परिषद घेण्यात आली. यावेळी ते बोलत होते. यावेळी गांधी यांनी ७ फेब्रुवारीला संसदेत अदानी उद्योगसमूहात गुंतवलेल्या शेल कंपन्यातील २० हजार कोटी रूपये कोणाचे? असा प्रश्न उपस्थित केला होता. यामुळे अडचण होत असल्याचे लक्षात आल्यावर भाजपाने सुडबुद्धीने कारवाई केली आहे. राहुल गांधी यांच्या देशव्यापी भारत जोडो यात्रेने पक्षाला पुन्हा गतवैभव प्राप्त होईल यामुळे २०२४ च्या निवडणुकी अगोदर पक्षाचा चेहरा मिळू न देणायाचा प्रयत्न भाजप करीत असल्याचा आरोप करणायात आला. या पत्रकार परिषदेस तालुका अध्यक्ष सौदागर जाधव, जिल्हा संघटक जहीर मणेर, सचिन खैरेपाटीलख, व्हीजेएनटी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष भिमराव बंडगर, टेंभुर्णी शहराध्यक्ष सोमनाथ कदम, कुर्डूवाडी शहराध्यक्ष फिरोज खान, हमीद शिकलकर, ज्ञानेश्वर वाघ माजी तालुका पंचायत समिती सदस्य दिपक देशमुख शाहुराजे जगताप आदि उपस्थित होते.

घरातील हिश्यासाठी एकाने पेटवून घेतले

सुराज्य/सोलापूर

घर जागेत हिस्सा मागण्याकरिता गेलेल्या एका तरुणाने स्वतःला पेटवून घेतल्याची घटना दि.७ मार्च रोजी रात्री दीड वाजण्याच्या सुमारास समरानगर येथे घडली.याप्रकरणी उर्मिला सिताराम लिंबोळे (वय-२८,रा.बालाजी मंदिर जवळ, अशोक चौक) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली.

त्यांच्या फिर्यादीवरून देविदास नामदेव लिंबोळे (रा.अशोक चौक) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. राजकुमार सिताराम लिंबोळे (वय-२८, रा.समरा नगर) हे लिंबोळे यांचे काका देविदास लिंबोळे यांना अशोक चौक येथील घर जागेत हिस्सा मागण्याकरिता गेले. त्यावेळी त्यांनी नकार दिल्याने राजकुमार यांनी स्वतःहून पेटवून घेतले. त्यानंतर ते उपचारास स्वतःहून दाखल झाल्यानंतर त्यांच्यावर उपचार चालू असताना दि.१४ मार्च रोजी मयत झाले. यास वरील संशयित आरोपी हा जबाबदार असून,म्हणून फिर्यादी यांची राजकुमार यांच्याविरुध्द तक्रार असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक चौधरी हे करीत आहेत.

जि.प.च्या समाजकल्याण विभागाकडून ४९ कोटींचे वितरण

सुराज्य/सोलापूर

अनुसूचित जाती व नवोदय घटकांच्या वस्त्यांचा विकास करण्यासाठी जि.प.च्या समाज कल्याण विभागाकडून ४९ कोटी तीन लाख रुपयांचे वितरण करण्यात आले. ४ कोटी ४८ लाख इतका निधी प्राप्त होता. विकास कामे ही पारदर्शी होण्यासाठी योजनेंतर्गत पंचवार्षिक आराखडा तयार करणेत आलेला होता.

जिल्हयात सुमारे ४५०० वस्त्या या निश्चित करण्यात आल्या होत्या. चालू वर्षी विविध विकास कामांसाठी सर्व तालुक्यातून प्रस्ताव प्राप्त झालेले होते. त्यापैकी शासन निर्णयाच्या आधारे १२४६ मागास वस्त्यांची निवड करण्यात आलेली आहेए व या कामांना ९०% प्रमाणे ४९ कोटी ०३ लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. यातून मागासवर्गीय वस्त्यांमध्ये प्राधान्याने रस्ते, भुमिगत गटारी, नवीन समाजमंदिर, जुने समाजमंदीर दुरुस्ती, पेव्हर ब्लॉक,वस्तयांना विजेची सोय करणे, पाणीपुरवठा सोय इ. कामे घेण्यात आलेली आहेत. यासाठी जिल्हा परिषद चे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी, अति.मुख्य कार्यकारी अधिकारी संदिप कोहिनकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी अजय पवार व जिल्हा समाजकल्याण अधिकारी श्री सुनिल खमितकर यांनी परिश्रम घेतले.

आकाशवाणी सोलापूर केंद्रात उद्या रक्तदान शिबीर

सुराज्य/सोलापूर

आकाशवाणी सोलापूर केंद्राच्या ३७ व्या वर्धापनदिनानिमित्त आकाशवाणी सोलापूर केंद्राच्या वतीने सोमवार दि. ३ एप्रिल २०२३ रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

सकाळी ९.०० ते दुपारी १.०० वाजेपर्यंत श्री सिध्देश्वर रक्तपेढीमार्फत रक्तसंकलनाचे काम केले जाईल. जास्तीत जास्त रक्तदात्यांनी रक्तदान करून सहकार्य करावे असं आवाहन आकाशवाणी सोलापूर केंद्राच्या अभियांत्रिकी विभाग प्रमुख अर्चिता ढेरे आणि कार्यक्रम विभागप्रमुख सुजित बनसोडे यांनी केलं आहे.

गहाळ झालेले १ लाख ६५ हजारांचे १३ मोबाईल जप्त

सदर बझार पोलीस ठाण्याची उत्कृष्ट कामगिरी; मोबाईल लवकर मूळ मालकांना परत देणार

सुराज्य/सोलापूर

शहरातील सदर बझार पोलिस ठाणे हद्दीतील विविध ठिकाणांतून गहाळ झालेले १३ मोबाइल पोलिसांनी शोधून काढले. यात एकूण १ लाख ६५ हजारांचे १३ मोबाइल जप्त करण्यात आले आहे. ही कारवाई पोलिस निरीक्षक राघवेंद्रसिंह क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

सदर बझार पोलिस ठाणे हद्दीतील मोबाइल गहाळ झाल्याच्या घटना नोंद झाल्या होत्या. याप्रकरणी मोबाइलचा तपास करताना डीबी पथकाचे पोलिस उपनिरीक्षक सचिन माळी यांच्या पथकाने तांत्रिक माहितीच्या आधारे वरील मोबाइल शोधले.ते मोबाईल मूळ मालकांना सुपुर्द करण्यात येत आहेत. ही कामगिरी सहायक पोलिस आयुक्त माधव रेड्डी, पोलिस निरीक्षक राघवेंद्रसिंह क्षीरसागर, पोपटराव धायतोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.उपनि. सचिन माळी, औदुंबर आटोळे, इसाक नदाफ, रफिक इनामदार, शहाजहान मुलाणी, राजेश चव्हाण, सागर सरतापे, अय्याज बागलकोटे, राम भिंगारे, विठ्ठल काळजे, सागर गुंड, सोमनाथ सुरवसे, अबराज दिंडोरे यांनी केली.

बांगर्डेचे नूतन सरपंच दडस यांचा वेळापूर येथे सत्कार

वेळापूर : वेळापूर तालुका माळशिरस येथील गरुड बंगला येथे बांगर्डे ग्रामपंचायत नूतन सरपंच मोहन दडस यांचा उत्तमराव जानकर यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

यावेळी माजी पंचायत समिती सदस्य मधुकरभाऊ पाटील, फोंडशिरस गावचे सरपंच पोपट बोराटे, बांगर्डे गावचे माजी सरपंच शंकर मेटकरी, माजी सरपंच अशोक दडस, विद्यमान ग्रामपंचायत सदस्य भाऊ दडस, फोंडशिरस ग्रामपंचायत सदस्य प्रदीप गोरे आदी. यावेळी उपस्थित होते.

एप्रिल फूलचा दिवस मोदींच्या विकासाचा वाढदिवस म्हणून साजरा

सुराज्य/माढा

१ एप्रिल हा मजेशीर जोक व कॉमेंटचा दिवस म्हणून ओळखला जातो. त्यादिवशी कधीही शक्य न होणाऱ्या गोष्टींवर विनोद करण्याची परंपरा आहे. या बाबतीत अगदी लहान मुलांपासून ते मोठ्या मुलांपर्यंत जोक करत असतात. त्यातच आता राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने १ एप्रिल हा एप्रिल फुलचा दिवस मोदीचा विकासाचा वाढदिवस म्हणून पंढरपूर साजरा करण्यात आला.

भाजपाला मत दिले की बाहेर देशातील काळा पैसा भारतात आणून सर्वांच्या खात्यावर १५ लाख रुपये जमा करू असे आश्वासन मोदी यांनी दिले होते ते आजपर्यंत पूर्ण झालेले नाही. त्याची आठवण सर्वसामान्य नागरिकांना करून देण्यासाठी १ एप्रिल दिवशी जुमला सहकारी बँक यांच्या फसव्या आश्वासनाला बळी पडलेल्या लाभार्थी यांना १५ लाख रूपये अकडा लिहिलेला प्रतिकात्मक चेक वाटप करून आंदोलन करण्यात आले. सदरचे आंदोलन राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश सचिव श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले.

यावेळी जिल्हाध्यक्ष गणेश पाटील, जिल्हा उपाध्यक्ष बापूसाहेब शिंदे, तालुकाध्यक्ष संतोष चव्हाण, उपाध्यक्ष विशाल सावंत, शुभम पवार, उद्योग व्यापार सेलचे अध्यक्ष उमेश सासवडकर, कपिल जगताप, सारंग महामुनी, निलेश कोरके, नगरसेवक मोहम्मद उस्ताद, युवक काँगस आयचे शहराध्यक्ष संदीप शिंदे, समीर कोळी, संग्राम जाधव आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

जीवनाचा आनंद घेण्यासाठी मन मोकळे ठेवा : आफळे

भागवत कथा सप्ताहाची गोपाळ काल्याने सांगता

सोलापूर : मनुष्याने जीवनाचा आनंद घेण्यासाठी आपले मन मोकळे ठेवले पाहिजे. कोणतेही ओझे,दडपण मनावर ठेवू नका असे आपल्या निरूपणातून हरिभक्त परायण चारूदत्त आफळे गुरूजी यांनी केले.

डॉ.राजीव दबडे आणि डॉ.माधुरी दबडे यांच्या कृष्णामाई हॉस्पिटलच्या वतीने आयोजित व्यास मुनींच्या सिध्दहस्ते लिखित भागवत पुराण कथा सप्ताहाच्या शेवटच्या दिवशी ते बोलत होते. गोपाळ काल्याने या भागवत सप्ताहाची सांगता बुधवार दि. २९ मार्च रोजी करण्यात आली. प्रारंभी डॉ. माधुरी दबडे यांनी प्रास्ताविक करीत गेल्या सात दिवसापासून आयोजित भागवत पुराण कथा सप्ताहाबाबत माहिती दिली. या भागवत सप्ताहाचे आयोजन केल्याबद्दल रसिकश्रोत्यांकडून डॉ. माधुरी दबडे आणि डॉ. राजीव दबडे यांचा शाल श्रीफळ पुष्पहार देवून सत्कार करण्यात आला. त्यानंतर गुरू वंदना आणि कृष्णाष्टकाने भागवत पुराण कथेला प्रारंभ करण्यात आला. भागवत पुराण कथा सांगत आफळे गुरूजींनी भूपाळी, भजन, भक्तिगीतेही अत्यंत रसाळवाणीतून सादर केले त्याला भाविक भक्तांनी मोठा प्रतिसाद दिला. भागवत कथा समारोप करण्यापुर्वी गोपाळ काला करण्यात आला. त्यावेळी उपस्थिती भाविकांनी सभागृहातील मोकळ्या जागेत आणि स्टेजवर येवून चांगलाच ठेका धरून दांडिया, फुगडी खेळ खेळला. शेवटी भगवान श्रीकृष्णाच्या मुर्तीची डॉ. राजीव दबडे आणि डॉ. माधुरी दबडे तसेच यश दबडे यांच्या हस्ते पूजा करून या भागवत सप्ताहाचा समारोप करण्यात आला.

चैत्री वारीच्या तोंडावर पंढरपुरात कोरोनाचे ४ रुग्ण

सुराज्य/पंढरपूर

चैत्री एकादशी निमित्त पंढरपूरात २ लाख भाविक दाखल झाले असताना पंढरपूरात कोरोनाचे ४ रुग्ण आढळल्याने खळबळ उडाली आहे. आरोग्य यंत्रणा पुन्हा एकदा सतर्क झाली आहे. गेल्या काही दिवसापासून कोरोनाचे रूग्ण वाढत असून १ एप्रिल २०२३ च्या अहवालानुसार सोलापूर जिल्हा ग्रामीणमध्ये एकूण ७ पॉझिटिव्ह रूग्ण आढळून आले असून यातील ४ पंढरपूर तालुक्यातील आहेत. एक ग्रामीण भागात तर पंढरपूर शहरात तीन जणांची नोंद आहे. यातच पंढरपूरात सध्या चैत्री यात्रा भरली आहे.

सध्या ग्रामीणमधील एकूण २० जणांवर उपचार सुरू आहेत. आजवर जिल्हा ग्रामीणमध्ये कोरोनाच्या १ लाख ८७ हजार ४५५ रूग्णांची नोंद असून ३ हजार ७३१ जणांनी या आजारात प्राण गमावले आहेत. कोरोनाकाळात सर्वाधिक रूग्ण पंढरपूर तालुक्यात ३६ हजार ९०५ इतके नोंदले गेले होते.

मास्कचा वापर करण्याचे आवाहन

पंढरपुरात सध्या ४ कोरोनाचे रुग्ण आहेत. त्यांच्यावर घरीच उपचार सुरू आहेत. भाविकांनी गर्दीत जाणे टाळावे तसेच मस्कचा वापर करावा असे आवाहन तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ.बोधलेंनी केले.

म.बसवेश्वर पुतळा सुशोभिकरणाच्या निधीसाठी कार्यवाहीला आरंभ

▸ अमित पाटील यांच्या निवदेनाची दखल

सुराज्य/सोलापूर

कोंतम चौकातील महात्मा बसवेश्वरांच्या अश्वारूढ पुतळ्याच्या सुशोभिकरणासाठी भरीव निधी देण्याची मागणी भाजपचे माजी नगरसेवक अमित जगदीश पाटील यांनी पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्याकडे निवेदनाद्वारे केली होती. त्यावर कार्यवाही सुरू झाली आहे.

कौतम चौकातील बसवेश्वर पुतळा परिसर अनेक वर्षांपासून पद्मगोंडा कुटुंबीय व बसवेश्वर सर्कलच्या वतीने दर रविवारी पूजन व स्वचछता ठेवण्याचे काम करत असताना, त्यांनी पुतळा परिसर सुशोभिकरणं बाबत आपली व्यथा नगरसेवक जगदीश पाटील यांच्यापुढे मांडली होती. जगदीश पाटील यांनी सोलापूर शहर स्मार्ट होत असताना, समस्त वीरशैव समाजाचे श्रध्दास्थान असलेल्या बसवेश्वर महाराजांचा पुतळा परिसर देखील स्मार्ट व्हावा या करिता सुरुवातीला नगरसेवक अमित पाटील यांच्या निधीतून पुतळा परिसर सुशोभिकरणं करण्याचे काम केले. प्रशासकीय राजवट लागल्याने निधी अपूर्ण पडत असल्याने, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची जिल्हाध्यक्ष सचिन कल्याणशेट्टी यांच्या समवेत भेट घेऊन त्यांना निवेदन दिले. पुतळा परिसर सुशोभिकरणं करणे करिता आपण निधी द्यावा याकरिता त्यांना विनंती केली व याबाबत मुंबईत देखील जगदीश पाटील,बसवेश्वर सर्कलचे गुरुराज पदमगोंडा, अक्षय अंजिखाने, सागर अतनुरे यांनी राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट घेऊन वारंवार पाठपुरावा केला,व विखे पाटील साहेबांनी आयुक्त शीतल तेली उगले यांना, तात्काळ जिल्हाधिकारी साहेबांना प्रस्ताव सादर करण्याचे आदेश दिले. बसवेश्वर जयंती शनिवार दि.२२ एप्रिल रोजी साजरी केली जाणार आहे.



त्याअनुषंगाने पाटील यांनी डिसेंबर महिन्यापासूनच याचा पाठपुरावा सुरू केला होता.या निधीसाठी तातडीने प्रयत्न व्हावेत व २२ एप्रिलच्या आत सुशोभिकरणाचे काम पूर्ण व्हायला पाहिजे,अशी मागणी त्यांनी केली आहे. पालकमंत्री विखे पाटील साहेबांच्या आदेशानंतर महापालिकेकडून पुतळा परिसर सुशोभिकरणाचे नकाशा तयार करून, त्याला अखेर प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. बसवभक्तांमध्ये मोठ्या आनंदाचे वातावरण आहे. बसवभक्तांच्या भावनेचा विचार करता तात्काळ निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल नगरसेवक जगदीश पाटील, ब सवेश्वर सर्कल संघटनेचे गुरुराज पद्मगोंडा, सागर अतनुरे, आशिष दुलंगे, अक्षय अंजिखाने, विनोद गडगे, भागेश ख्याडे, चिंदा बगले व सर्व पदाधिकाऱ्यांनी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे आभार मानले.

महापालिका मालमत्ता कर विभागाची १८१ कोटींची उच्चांकी वसुली

सुराज्य/सोलापूर

सोलापूर महापालिका मिळकत कर मालमत्ता कर विभागाच्या वतीने उद्दिष्टाच्या पुढे जाऊन ही यंदा मार्च अखेरपर्यंत उच्चांकी अशी १८१ कोटी रुपयाची कर वसुली केली आहे. गेल्या सहा वर्षातील ही उच्चांकी वसुली ठरली आहे. थकीत मिळकत करा संदर्भात महापालिका आयुक्त शितल तेली-उगले यांनी मालमत्ता कर विभागास योग्य मार्गदर्शन करून १८० कोटीचे उद्दिष्ट दिले होते. त्यानुसार महापालिकेच्या मालमत्ता कर विभागाने उद्दिष्ट पेक्षाही एक कोटी रुपये अधिक अशी एकूण १८१ कोटी रुपये कर वसुली केली आहे.

▶ मोहिमेत ९५ मिळकती सील
▶ ९२ नळ कनेक्शन तोडले

सोलापूर महानगरपालिकेच्या कर वसुली संदर्भात विविध उपाययोजना करण्यात आल्या होत्या. यामध्ये प्रामुख्याने नागरिकांना पाच टक्के सूट रेबिट इतर बाबींची सूट नागरिकांना देण्यात आल्या होत्या. अभय योजनेच्या कालावधीमध्ये सोलापूर शहरातील शैक्षणिक संस्था, उद्योजक, शासकीय कार्यालय लक्ष करत जानेवारी महिन्यात १३५ कोटी कर वसुलीचा टप्पा गाठण्यात आला होता.

त्यानंतर कर वसुली संदर्भात आयुक्त यांनी यापुढे अभय योजना दिली जाणार नाही असे स्पष्ट केले होते. महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांच्या नेतृत्वाखाली आणि उपायुक्त विद्या पोळ यांच्या मार्गदर्शनाखाली नयोजन करत ही वसुली मोहीम यशस्वीरित्या राबविण्यात आली. त्यानंतर शहरातील थकीत मिळकत करापोटी परगुती, व्यवसायिक संस्था, उद्योजक, झोपडपट्टी परिसर,शासकीय कार्यालय अशा सर्वच घटकांवर,जप्ती व कारवाई मोहीम मोठ्या प्रमाणात हाती घेण्यात आली. ५०हजार वरील थकबाकी असलेले सर्व क्षेत्रातील मिळकतीवर कारवाई करण्यात आली. तीन लाखाचे थकबाकीदार यांना कर विभागाच्या कडून

नोटीस बजावण्यात आल्या होत्या. कर विभागाने आतापर्यंत ९५ मिळकती सील केल्या आहेत. त्याचबरोबर १९२ मिळकतदारांचे नळ कनेक्शन तोडण्याची कारवाई करण्यात आली आहे. यावेळी प्रथमच गवसू विभागाच्या वतीने जप्तीची कारवाई केल्याने गवसू विभागाची वसुली मोठ्या प्रमाणात झाली आहे. १८१ कोटी वसुली केल्याने आयुक्त शीतल तेली-उगले व उपायुक्त तथा करसंकलन विभाग नियंत्रण अधिकारी विद्या पोळ यांनी कर संकलन विभाग प्रमुख युवराज गाडेकर, कर वसुली अधिकारी व या मोहिमेतील सर्व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

सर्वांच्या परिश्रमाने वसुलीचे उद्दिष्ट गाठणे शक्य : पोळ

कारवाईसाठी फेब्रुवारी व मार्च या दोन महिन्यात मुख्य कार्यालयाचे दोन आणि प्रत्येक झोननिहाय एक पथक असे एकूण दहा पथक कर वसुलीसाठी कार्यान्वित करण्यात आले होते. त्यामुळे १८१ कोटीचा कर वसुलीचा उद्दिष्ट गाठणे शक्य झाले, असे उपायुक्त विद्या पोळ यांनी सांगितले.

यापुढेही वसुली मोहीम चालूच राहणार : आयुक्त

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने यापुढेही मालमत्ता कर संकलन विभागाकडून कर वसुली अशाच प्रकारे सुरू राहणार आहे. कारवाई टाळण्यासाठी सोलापुरातील नागरिकांनी मिळकत कर भरून महापालिकेला सहकार्य करावे, असे आवाहन महापालिका आयुक्त शीतल तेली - उगले यांनी केले आहे.

मागील पाच वर्षाची आकडेवारी अशी

सन -२०१७-१८ -११७ कोटी ६४ लाख रुपये ❊ सन -२०१८-१९ - १०८ कोटी ७८ लाख ❊सन -२०१९-२० - १३९ कोटी ९३ लाख ❊ सन -२०२०-२१ - १०९ कोटी ९२ लाख ❊ सन -२०२१-२२ - १३६ कोटी ४४ लाख ❊ सन -२०२२-२३ - १८१ कोटी रुपये

बोरामणी गावात श्रीराम मंदिराचे भूमिपूजन आणि मिरवणूक

सोलापूर : दक्षिण सोलापूर तालुक्यातील बोरामणी गावात राम नवमीनिमित्त श्रीराम मंदिराचे भूमिपूजन आणि उत्सव मूर्तीची मिरवणूक काढण्यात आली. जय श्रीराम आणि जय हनुमान जय गजराने परिसर दुमदुमून गेला होता. गावातील श्रीराम प्रतिष्ठान, जय हनुमान तरुण मंडळाच्यावतीने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या प्रमुख उपस्थितीत भूमिपूजन झाले. खासदार डॉ जयसिध्देश्वर शिवाचार्य, भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष शहाजी पवार, दिलीप सिध्दे, उदय पाटील, रामप्पा चिवडशेट्टी, तालुका पोलिस ठाण्याचे निरीक्षक नामदेव शिंदे, अण्णाराव बाराचारे, तुळजापूरचे सभापती पिंटू मुळे ,युवा उद्योजक सागर कत्ते, तालुका चिटणीस सुनील कळके, माजी भाजप अध्यक्ष सिध्दाराम हेले आणि भाजप कार्यकर्ते मधुकर चिवरे आदींची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमासाठी बोरामणीचे सरपंच प्रकाश आवटे, उपसरपंच नरुद्दीन पठाण, पत्रकार रवी मस्के बोरामणी विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन भारत कवडे, व्हा. चेअरमन केशव धोत्रे यांच्यासह कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

श्री दिगंबर मुनिनाथ महाराजांची सामुदायिक महाआरती

सोलापूर : दिगंबर मुनिनाथ महाराजांच्या ४७ व्या पुण्यतिथीनिमित्त महाआरती करण्यात आली. हा महोत्सव गुढीपाडव्यापासून चैत्र शुद्ध अष्टमीपर्यंत विविध धार्मिक सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांद्वारे साजरा करण्यात आला. या महोत्सवाच्या शेवटच्या दिवश शुद्ध अष्टमी सकाळी ७ ते ९ वाजेपर्यंत महाराजांच्या मूर्तीला महाभिषेक करण्यात आला. राकेश अन्नम महाराज यांचे काल्याचे किर्तन आणि दुपारी १ वाजता शेकडो भावीक भक्तांच्या उपस्थित सामुदायिक महाआरती श्री अन्नम महाराज यांच्या हस्ते करण्यात आले महाआरती झाल्यानंतर सर्व संत महंतांचा सत्कार करण्यात आला. यावेळी विष्णू कारमपुरी, श्रीनिवास कुसुरकर, नागनाथ कारमपुरी, श्रीनिवास चिलवेरी व भाविक उपस्थित होते.

चोरट्याने दुचाकी पळवली

सुराज्य/सोलापूर

एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नागेंद्र नगर मजरेवाडी येथे २८ मार्च रोजी दुपारी दोन ते चार वाजण्याच्या दरम्यान चोरट्याने दुचाकी चोरून नेल्याची घटना घडली.

फिर्यादी रविकांत निलप्पा गावडे (वय-२७, रा. नागेंद्र नगर मजरेवाडी यांची दुचाकी क्रमांक एम.एच.१३.सीवाय.०५९० ही चोरून नेली आहे. याप्रकरणी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक गायकवाड हे करीत आहेत.

गुळवंची येथे शिवसेनेतर्फे आरोग्यमंत्री सावंत यांचा निषेध

उत्तर सोलापूर : शिवसेनाप्रमुख हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्याबद्दल बेताल वक्तव्य केल्याबद्दल आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांच्या विरोधात उत्तर सोलापूर तालुका शिवसेना ठाकरे गटाच्यावतीने शिवसेना संपर्कप्रमुख अनिल कोकीळ यांच्या मार्गदर्शनाखाली, जिल्हाप्रमुख गणेश वानकर यांच्या आदेशानुसार तालुकाप्रमुख संजय पौळ यांच्या नेतृत्वाखाली तालुक्यातील गुळवंची येथे आंदोलन करण्यात आले.

शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्याबद्दल आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांनी चुकीचे वक्तव्य केल्याबद्दल जाहीर

निषेध, जोडेमारो आंदोलन करून तीव्र शब्दात निषेध व्यक्त करण्यात आला. अशाप्रकारचे वक्तव्य शिवसैनिकांकडून कदापि खपवून घेतले जाणार नाही, असा इशाराही शिवसेनेच्या वतीने तालुका प्रमुख संजय पौळ यांनी दिला आहे. यावेळी शिवसेना उपतालुकाप्रमुख सचिन घोडके, संभाजी ब्रिगेडचे तालुका अध्यक्ष नितीन भोसले, माजी सभापती धनंजय लामकाने, विभाग प्रमुख हरिदास कुंभार, महेश साठे कारंबा गावचे उपसरपंच ज्ञानेश्वर जगताप, उपविभाग प्रमुख सतिश गरड, नागनाथ गुत्ती, शाखाप्रमुख उपविभाग प्रमुख अरुण लोंढे, अकोलेकाटीचे उपसरपंच राजेंद्र घाटे, प्रसिध्दी प्रमुख प्रशांत चव्हाण, शाखाप्रमुख प्रमोद गवळी, गणेश खारे गणेश काळे सिध्देश्वर थिटे, भाऊ कांबळे , गुळवंची चे उपसरपंच सागर राठोड, युवासेनेचे समाधान साबळे, गुळवंची चे सरपंच दिनेश जगताप, गुळवंचीचे माजी सरपंच विष्णू भोसले, उपसरपंच श्रीकांत आदाटे, महावीर भोसले, कारंबाचे उपसरपंच ज्ञानेश्वर जगताप, शशिकांत आतकरे, शिवाजी वाकसे, मारुती ढगे, योगेश माळी, नाव्हजचे उपशाखाप्रमुख अनिल पवार, सुभाष गावडे यांच्यासह उत्तर तालुक्यांतील शिवसैनिक उपस्थित होते.

सांगोल्याच्या विद्यार्थ्यांची कॅम्पसमध्ये निवड

सुराज्य/सांगोला

सांगोला महाविद्यालय सांगोला येथे किरण अकॅडमी, पुणे या कंपनीचा कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्ह पार पडला. या कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्हमध्ये सांगोला महाविद्यालयाच्या संगणक विभागातील सात विद्यार्थ्यांची निवड झाली. अशी माहिती महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. सुरेश भोसले यांनी दिली. प्रतिक्षा भुसे, ऋतुजा दिवसे, ऋतुजा रणदिवे, रोहन सुरवसे, विवेक घाडगे, स्वप्नाली जाधव शिवाजी, प्रकाश गाडेकर यांची निवड करण्यात आली.

सेतू सुविधा केंद्राचे कामकाज कायमचे बंद

महाईसेवा केंद्रातून दाखले घेण्याचे प्रशासनाचे आवाहन

सुराज्य/सोलापूर

सोलापूर शहर व जिल्ह्यातील सेतू सुविधा केंद्र चालविण्याचा देण्यात आलेला ठेक्याची मुदत संपली आहे. यापुढे नागरिकांनी आपल्या रहिवाशी भागात कार्यरत असलेल्या आपले सरकार सेवा केंद्र (महा ई सेवा केंद्र) मार्फत विविध दाखले व सेवा सुविधांचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

३१ मार्च २०२३ रोजी ही मुदत संपुष्टात आली आहे. जिल्हा सेतू

समिती, सोलापूर यांच्यामार्फत सोलापूर शहर व जिल्ह्यातील ग्रामीण भागात आपले सरकार सेवा केंद्र (महा ई सेवा केंद्र) स्थापन करण्यात आलेली आहेत. ते सध्या कार्यरत आहेत. तरी यापुढे नागरिकांनी आपल्या रहिवाशी भागात कार्यरत असलेल्या आपले सरकार सेवा केंद्र (महा ई सेवा केंद्र) मार्फत विविध दाखले व सेवा सुविधांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने जाहीर केले आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयातील, तहसिल कार्यालयातील ९ असे दहा सेतू सुविधा केंद्र १ एप्रिल पासून बंद करण्यात आल्याचे जाहीर केले आहे. सेतू कार्यालयातील सर्व साहित्य प्रशानाने ताब्यात घेतले आहे.

राजकारण न करता गावाच्या विकासासाठी सर्वांनी एकत्र या : शिंदे

सुराज्य/नाझरे

बलवडी (ता.सांगोला) गावासाठी शिरभावी योजनेचे पैसे भरून उन्हाळ्यात पिण्याचे पाणी मिळत नाही व यासाठी साहेबराव शिंदे, सत्यजीत लिगाडे, सरपंच माऊली राऊत, उपसरपंच समाधान शिंदे व ग्रामपंचायत सदस्य शिवाजी शिंदे व त्यांच्या टीमने मान नदी पात्रातून पिण्याचे पाणी गावासाठी उपलब्ध करून दिले आहे. विकास कामात राजकारण न आणता सध्याच्या ग्रामपंचायतीच्या सर्व सदस्याच्या पाठीमागे गावाने उभे राहणे गरजेचे आहे, असे मत माजी सरपंच शिंदे यांनी केले.

नदीपात्रात विहीर घेऊन ते पाणी पिण्यासाठी सुरू केले व त्याचे भूमिपूजन करून नाथ मंदिरापर्यंत पाणी आणून मंदिरातही पाण्याचे पूजन केले. विकासासाठी मतभेद व मनभेद गाडा व आम्ही जुनी मंडळी सर्व तरुणाच्या पाठीमागे उभा राहून पालकाची भूमिका बजावू व यासाठी सर्वांनी एक व्हा असे सत्यजित लिगाडे म्हणाले.

यावेळी चंद्रकांत सादिगिले, सुरेश गुरव, माजी सरपंच प्रसाद शिंदे, ग्रामपंचायत सदस्य रविराज शिंदे, विलास धायगुडे, विकास पवार, बाबासाहेब पालसांडे, शिवाजी राऊत, शिवाजी शिंदे, मारुती करडे, संजय करडे, महादेव शिंदे, अशोक खुळपे, सुरेश गुरव, अध्यक्ष सर्जेराव मोहिते, चांगदेव शिंदे, पोलीस पाटील श्रीकांत तोरणे, विलास बापू शिंदे, अजिंक्य शिंदे, सदाशिव गायकवाड, प्रकाश शिंदे, आकाश शिंदे, विजय शिंदे व ग्रामस्थ उपस्थित होते.शेवटी आभार महादेव शिंदे यांनी मानले.

चारित्र्यावर संशय घेत पत्नीला दिले हाकलून; पतीवर गुन्हा

सोलापूर : चारित्र्यावर संशय घेत व सामुहिक विवाहमध्ये मानपान केला नाही मनत कर्ज फेडण्यासाठी माहेरहून दोन लाख रुपये घेऊन ये अशी मागणी करत विवाहितेला शारीरिक व मानसिक त्रास देऊन तिचे मंगळसूत्र व मोबाईल विकून छळ करून घरातून हाकलून दिल्याची घटना उघडकीस आली आहे.

ही घटना दि.२५ फेब्रुवारी २०२१ ते ६ फेब्रुवारी २०२३ पर्यंत फिर्यादी यांच्या सासरी घडली. दरम्यान ६ फेब्रुवारी रोजी विलास याने फिर्यादी यांच्या माहेरी जाऊन त्यांच्या घरातील संसार उपयोगी वस्तू रस्त्यावर फेकून फिर्यादी यांच्या आईस शिवीगाळ करत मारहाण केली. अशा आशयाची फिर्याद श्वेता विलास तलाठे (वय-२१, रा.बेडर पूल) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात दिली आहे. फिर्यादीवरून विलास राजू तलाठे (वय-२५,रा.उत्तर सदर बझार) विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार वाडेकर हे करीत आहेत.

चोरट्याने तरुणीचा मोबाईल पळवला

सुराज्य/सोलापूर

अज्ञात चोरट्याने तरुणीचा मोबाईल चोरून नेल्याची घटना दि.२९ मार्च रोजी पहाटे तुळजाभवानी नगर येथे राहत्या घरी घडली. याप्रकरणी वैष्णवी वीरप्पा अरवत (वय-१८,रा.तुळजाभवानी नगर, अक्कलकोट रोड) हिने एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. वैष्णवी व त्यांची आई जेवण करून रात्री टेरेसवर झोपण्यासाठी गेले होते. पहाटे त्यांना बाजूला ठेवलेला मोबाईल मिळून आला नाही, असे फिर्यादीत नमूद आहे. तपास पोलीस हवालदार भांगे हे करीत आहेत.

विनयभंग केल्याप्रकरणी तरुणावर गुन्हा

सोलापूर : तरुणीशी ओळख वाढवत, तिच्या सोशल मीडियावर तिला मॅसेज पाठवत विनयभंगप्रकरणी तरूणावर गुन्हा दाखल झाला आहे.

याप्रकरणी आवेज परवेज पडसलगे याच्यावर विनयभंगाचा गुन्हा दाखल झाला आहे. याप्रकरणी पीडितेने फिर्याद दिली

आहे.आरोपी आवेज हा मागील जवळपास वर्षभरापासून पीडित १८ वर्षीय तरुणीचा पाठलाग करत होता. शिवाय तिच्या सोशल मीडिया अकाऊंटवर मॅसेज पाठवत तिला त्रास देऊ लागला. यामुळे पीडितेने आवेजला ब्लॉक केले. यामुळे तो तिचा पिच्छा करत होता. अशा आशयाची फिर्याद पीडितेने दिली आहे.या फिर्यादीवरून आरोपी आवेज पडसलगे याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा तपास पोलिस करत आहेत.

एसटीमधील दोन बॅटऱ्या पळवल्या

सोलापूर : एसटी कार्यशाळा विभाग १ मधील गाडी क्र .एमएच.१२.ईएफ.६३८७ या वाहनातील १८ हजार रुपये किमतीच्या दोन बॅटऱ्या अज्ञात चोरट्याने चोरून नेल्या आहेत.ही घटना ३१ मार्च ते १ एप्रिल दरम्यान सोलापूर एसटी कार्यशाळा विभाग १ येथे घडली. याप्रकरणी विठ्ठल बळीराम भोसले (वय-५४,रा.वांगी) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल डोके हे करीत आहेत.

ईश्वर नगरात घर फोडून सोन्याचे दागिने लंपास

सुराज्य/सोलापूर

घरात कोणी नसल्याची संधी साधत राहत्या घराचा कडी-कोंयडा तोडून अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश करत चोरट्याने ६० हजारांचा ऐवज लंपास केला.

ही घटना दि.२८ मार्च ते १ एप्रिल दरम्यान ईश्वर नगर येथे

घडली. रूपाली धनंजय नंदी (वय-३८, रा.ईश्वर नगर) या माहेरी गेल्या होत्या.त्यावेळी चोरट्याने घरातील ३० हजार रुपये किमतीचे एक तोळ्याचे सोन्याचे नेकलेस,१५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे कर्णफुले, १५ हजार रुपये किमतीचे सोन्याची गळ्यातील, चैन व त्यासोबत पदक असा एकूण ६० हजारांचा ऐवज चोरून नेला आहे.

याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात दिली आहे. तपास पो.स.ई. रजपूत हे करीत आहेत.

विमा पॉलिसी काढून देतो म्हणत वाहनधारकांची तीन कोटींची फसवणूक

सोलापूर : कमी किमतीचा प्रीमियरसह वाहन विमा पॉलिसी काढून देतो असे म्हणत वाहनधारकांची २ कोटी ९३ लाख ६८ हजार ८३६ रुपयांची फसवणूक केल्याची घटना उघडकीस आली आहे. ही घटना सन २०२२ ते २०२३ या कालावधी दरम्यान आरटीओ ऑफिस जवळ घडली.

याप्रकरणी विनय रामकृष्ण मंत्री (वय-५१, रा.एकता फेस्टिवल शास्त्रीनगर नारायणपुरा, अहमदाबाद, ऑफिस डफरीन चौक सोलापूर) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अजय कोरवाल (रा.सिध्दार्थ ऑनलाइन सर्व्हिसेस आरटीओ ऑफिससमोर, विजापूर रोड, सोलापूर) व प्रदीप सावंत (रा.चोलामंडलम एमएस जनरल इन्शुरन्स कंपनी, डफरीन चौक, सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. सन २०२२ ते २०२३ यादरम्यान वरील संशयित आरोपी यांनी चोलामंडलम एमएच जनरल इन्शुरन्स कंपनी लि.यांची वेबसाईट चलो इन्शुरन्सचा वापर केला.

त्या कंपनीचे एजंट असल्याचे भासवून

महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश, गोवा, पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश, राजस्थान मधील मोटर वाहनधारकांना कमी किमतीचा प्रीमियम देतो असे आमिष दाखवले. तशा बनावट पॉलिसी तयार करून त्या बनावट वाहन विमा पॉलिसी काढून घेऊन चोला मंडल इन्शुरन्स कंपनीचे व वाहनधारकांचे फसवणूक करून कंपनीचे एकूण २ कोटी ९३ लाख ६८ हजार ८३६ रुपयांची फसवणूक केली आहे. असे फिर्यादीत नमूद आहे. घटनेचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक बंडगर हे करीत आहेत.

संत लोटांगण महाराज पालखी सोहळ्याचे उपळाईमध्ये स्वागत

सुराज्य/मोडनिंब

संत लोटांगण महाराज मूळ रामनवमी पायदळ दिंडी सोहळा श्रीक्षेत्र गौळ जिल्हा वर्धा ते पंढरपूरमार्गे उपळाई येथे येथून पुढे पंढरपूरला प्रस्थान करता झाला. श्री संत लोटांगण महाराज यांनी याच मार्गाने अखंड २२ वर्षे पंढरपूरची लोटांगण वारी केली होती. त्याच मार्गाने महाराष्ट्रातील ७८ गावातून ,१९ तालुक्यामधून व ८ जिल्ह्यांची सीमा ओलांडत आज ही याच मार्गाने हा दिंडी सोहळा पंढरपूरला पोहोचत आहे.

ह.भ.प. कर्मयोगी सद्गुरु बाबाराव अण्णाजी खराबे महाराज यांनी इसवी सन २०११ पर्यंत अखंड ही पायीदिंडी सोहळ्याची सेवा करून पायदळ वारीचे उत्तराधिकारी म्हणून ह.भ. प. संत

सेवक रवींद्रजी विलायतकर महाराजांना मानसपुत्र बनवून त्यांच्याकडे ही लोटांगण वारीची परंपरा सोपविली आहे.आता ते दरवर्षी हा दिंडी सोहळा पंढरपूर साठी येऊन येतात.गौळ येथून प्रस्थान झालेला सोहळा मुळ लोटांगण महाराज यांच्या नंतर ह भ प सेवा मूर्ती नारायण महाराज राऊत, सद्गुरु श्री दौलत महाराज अलोने व पुढे कर्मयोगी बाबारा खराबे महाराज व त्यांच्यानंतर संत सेवक रविंद्रजी विलायत कर महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली दिंडी सोहळा दरवर्षी पंढरपूरला पोहोचतो आहे. दरवर्षी प्रमाणे उपळाईमध्ये अरविंद नकाते व विश्वनाथ नकाते यांच्या घरी दिंडीसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. तेथे मुक्काम करून हा सोहळा पुढे पंढरपूरला मार्गस्थ झाला.१५फेब्रुवारी बुधवारी रोजी प्रस्थान केलेला हा सोहळा २९ एप्रिलला पंढरपूरला पोहोचत आहे. सुमारे ४२ दिवस या दिंडिचा पायी प्रवास आहे. पंढरपूरमधे बाबाराव खराबे महाराज सेवाग्राम ट्रस्ट येथे चैत्र शुद्ध अष्टमीला सांगता समारंभ होईल. दिंडी संचालक म्हणून हरिभक्त परायण श्री रवींद्रजीविलायत कर श्रीक्षेत्र गौळ तालुका देवळी जिल्हा वर्धा दिंडी मध्ये संचालक म्हणून काम पहात आहेत. महाराष्ट्रातील सर्वात मोठा लांबलचक पायी वारी सोहळ्याची शिस्त वेगळीच आहे.यंदा रविवारी २ एप्रिलला या सोहळ्याची सांगता होणार आहे.

‘दक्षिण’च्या पाणी प्रश्नावर आ. देशमुखांचा सिंचन भवनसमोर ठिय्या

टेलएंडपर्यंत लवकरच पाणी सोडण्याचे अधिकाऱ्यांचे लेखी आश्वासन

सुराज्य/ सोलापूर

दक्षिण सोलापूर तालुक्यातील सिना नदी व कुरूल कॅनॉलमध्ये पाणी नसल्याकारणाने परिसरातील शेतीचे नुकसान होत आहे. सध्या तीव्र उन्हाळा असताना देखील पाटबंधारे विभागामार्फत सिना नदी व कुरूल कॅनॉलमध्ये टेलएंडपर्यंत पाणी सोडलेले नाही. या उद्‌भवलेल्या पाण्याच्या प्रश्नी दक्षिण तालुक्याचे भाजपचे आमदार सुभाष देशमुख यांनी शेतकऱ्यांना घेऊन सिंचन भवन, गुरूनानक चौक या ठिकाणी ठिय्या आंदोलन केले. ५ ते ६ दिवसात पाणी टेलएंडपर्यंत सोडण्याच्या अधिकाऱ्यांच्या लेखी आश्वासनानंतर हे आंदोलन मागे घेण्यात आले.

या आंदोलनात सिना भीमा संघर्ष समितीचे अध्यक्ष आप्पासाहेब पाटील, संदीप टेळे, रामचंद्र बिराजदार, पंडित बुळगुंडे, राजुर सरपंच लक्ष्मण गडदे, औराद सरपंच शांतकुमार गडदे, सुभाष बिराजदार, विजयकुमार बिराजदार, हणमंत बिराजदार, सिध्दाराम ढंगापुरे श्रीशैल बिराजदार यतीन शहा यांच्यासह दक्षिण तालुक्यातील शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

यावेळी उजनी लाभक्षेत्र विकास प्राधिकरणाचे अधीक्षक अभियंता धीरज साळे व उपविभागीय अधिकारी शिरीष जाधव यांनी शेतकऱ्यांना समजावण्याचा प्रयत्न केला पण शेतकरी आक्रमक दिसून आले. कोर्सेगाव बंधाऱ्यापर्यंत पाणी पोचलेच पाहिजे, हक्काचं पाणी मिळालेच पाहिजे, सिनेला पाणी आलेच पाहिजे, हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकाऱ्या कारवाई करा, पाणी आमच्या हक्काचे नाही कुणाच्या बापाचं अशा घोषणा यावेळी शेतकऱ्यांनी दिल्या.

यावेळी आ. सुभाष देशमुख यांनी पाटबंधारे विभागाच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त केली.

एकीकडे उजनीतून भीमा नदीला पाणी सोडले जात आहे. दुसरीकडे सीना नदीत अजूनही पाणी आलेले नाही. उन्हाळा असल्याने सीना काठच्या शेतकरी तसेच जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर आहे पाणी सोडले जाते. मात्र, ते दक्षिण तालुक्यात शेवटपर्यंत येतच नाही, असे वारंवार आणि जाणीवपूर्वक केले जात असल्याचा आरोप केला.

हे आंदोलन अधिकाऱ्यांच्या विरोधात : आ. देशमुख

आपण सत्तेत असतानाही आंदोलन करावे लागते ही खंत आहे. मात्र, हे आंदोलन शासनाच्या विरोधात नसून तर अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणाच्या विरोधात आहे. पालकमंत्र्यांनी पाच पाळ्या पाणी सोडा असे सांगितले आहे. मात्र, एक पाळीही पाणी कोर्सेगाव बंधाऱ्यापर्यंत आले नाही. शेतकऱ्यांच्या व्यथा तीव्र आहेत. शेतकऱ्यांसाठी आपण हे आंदोलन अधिकाऱ्यांच्या विरोधात करत असल्याचे आमदार देशमुख यांनी यावेळी सांगितले.

आ. देशमुख यांनी लावला फडणवीस यांना फोन

आमदार देशमुख यांनी थेट राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाच फोन लावला. स्पीकर मोठा करून शेतकऱ्यांशी बोलताना फडणवीस म्हणाले, ‘माझे आणि आमदार देशमुख यांच्यासोबत चर्चा झाली असून मी वरिष्ठ अधिकाऱ्यांशी बोललो आहे, पाणी आजपासून चालू करतोय, लवकर पाणी येईल, असे सांगितले.

श्रीकांत देशमुख यांचा सत्कार

सुराज्य/वेळापूर : श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील बीज उत्पादन सहकारी संघाची पंचवार्षिक निवडणूक बिनविरोध पार पडली. चेअरमनपदी पिसेवाडी येथील श्रीकांत कल्याण देशमुख यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा महादेवभाऊ चव्हाण, माजी संचालक सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखाना, विष्णू तुकाराम पिसे, सुखदेव पिसे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला शिवांमृत दूध संघाचे नूतन संचालक व माजी सरपंच सुरेश पिसे, क्रांतीसुर्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष व माजी सरपंच आण्णासाहेब शेंडे, पिसेवाडी सरपंच मोहन भाकरे, उपसरपंच भाऊसाहेब पिसे, माजी उपसरपंच अशोक भाकरे, ग्रामपंचायत सदस्य पांडुरंग पिसे, सुभाष भाकरे, शिवाजी भाकरे, बापू भाकरे, सतिश पिसे आदी मान्यवर व ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.

इनरव्हील क्लबतर्फे सांगोला स्मशानभूमीत बसवले बेंच

सुराज्य/सांगोला : सांगोला येथील स्मशानभूमीत वयोवृध्द नागरिकांची होणारी गैरसोय टाळण्यासाठी इनरव्हिल क्लबच्या वतीने सहा लोखंडी बाक (बेंच) बसविण्यात आले आहेत. सदर लोखंडी बेंच साठी माणगंगा परिवार अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या वतीने चेअरमन नितीन विठ्ठल इंगोले यांनी अर्थसहाय्य केले. याप्रसंगी क्लबच्या अध्यक्षा उमा ऊंटवाले यांनी प्रास्ताविक करून क्लबच्या कामकाजाबाबत माहिती देऊन क्लबच्या इतर सदस्यांची ओळख करून दिली. कार्यक्रमांसाठी माणगंगा परिवार अर्बन को ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीचे संचालक सचिन इंगोले, सचिव स्वप्निल काळुंगे, क्लबच्या सचिव स्वाती मकरंद अंकलगी, ट्रेझर वर्षा शंकर बलाक्षे, व्हाइस प्रेसिडेंट सविता संजय लाटणे, पास्ट प्रेसिडेंट रत्नप्रभा किसन माळी, मेंबर कविता राजेंद्र दिवटे आदी मान्यवर उपस्थित होते.

जर्शी व म्हशीची वासरे घेऊन जाणारे वाहन पकडले

सुराज्य/कुर्डूवाडी : कत्तल व विक्री करण्याच्या उद्देशाने ३६ जर्शीची वासरे व २ म्हशींची वासरे घेऊन जाणार पिक-अपवर कुर्डूवाडी पोलिसांनी कारवाई करुन पकडला. पिकअपचा चालक आशपाक (रफीक शेख वय २६ रा. क्रांतीनगर, मोहोळ) व पिक अप मालक सदाम मैनद्दीन कुरेशी (रा. मोहोळ) या दोघांवर गुन्हा दाखल केला आहे.

३१ रोजी फिर्यादी पोलीस नाईक सोमनाथ रामचंद्र गायकवाड यांना ठाणे अलंदार यांना गाडी नं. एम. एच. ०८-०४१० पीकअप ही पिंपळनेरमार्गे कुर्डूवाडीकडे जनावरे घेऊन जात असल्याची माहिती मिळाली. गायकवाड व मंडलिक यांनी पंढरपूर चौक कुर्डू येथे नाकाबंदी करत वाहनाला पकडले. यामध्ये ३६ जर्शीची वासरे व २ म्हशींची वासरे आढळून आली. वासरांची कत्तल व विक्री करण्याच्या उद्देशाने भरून नेत असल्याची खात्री झाल्याने वरील दोघांवर पो. ना. गायकवाड यांच्या फिर्यादीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रेल्वे स्टेशन परिसरातून मोटरसायकल लंपास

सुराज्य/सोलापूर : सोलापूर रेल्वेस्टेशन परिसरातील रिझर्वेशन ऑफिस समोर पार्क करून ठेवलेली मोटार सायकल क्रमांक एमएच.१३. डीजे. ७७४६ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे.ही घटना २९ मार्च रोजी रात्री आठ ते दहा वाजण्याच्या दरम्यान घडली.

याप्रकरणी सलीम रहेमान शेख (वय-३०, रा. लिमयेवाडी) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार चव्हाण हे करीत आहेत. नार्थकोट प्रशालेच्या पाठीमागील गेटलगत असलेल्या पार्किंगमध्ये मोटारसायकल क्र. एमएच.१३.सीवी.६४२५ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेली असल्याची फिर्याद सुनील उमाकांत अंबाल (वय-३०, रा. आदर्श नगर) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात दिली आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक सरतापे हे करीत आहेत.

आमसभेत आ. राऊतांकडून अधिकाऱ्यांची झाडाझडती

सुराज्य/बार्शी

ग्रामीण भागाला मिळालेल्या निधीचा अपव्यय होता कामा नये. निकृष्ट कामांना संरक्षण देणाऱ्या अधिकाऱ्यांची गय करणार नाही, असे सुनावत आमदार राजेंद्र राऊत यांनी आमसभेत महसूल व जिल्हा परिषद ग्रामीण बांधकाम खात्याच्या अधिकाऱ्यांची झाडाझडती घेतली.

यावेळी विविध शासकीय कार्यालयांचे विभाग प्रमुख उपस्थित होते. यशवंतराव चव्हाण सभागृहात झालेल्या आमसभेत आमदार राऊत म्हणाले, ‘ग्रामीण भागाला शासनाकडून मिळालेल्या निधीचा योग्य वापर झाला पाहिजे. १५ व्या वित्त आयोगापासून ते २५-१५ या लेखाशिर्षकाखाली मिळालेल्या अनुदानापर्यंत सर्वच निधीतून कामे दर्जेदार झाली पाहिजेत अधिकाऱ्यांनी नियमानुसार काम करावे कोणाच्याही दबावाला बळी पडू नये.’

शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांचे फायदे पात्र लाभार्थ्यांनाच मिळाले पाहिजेत याची दक्षता घ्यावी. श्रावणबाळ योजनेमध्ये मंजूर लाभार्थींची नावे पुन्हा यादीतून वगळली जाण्याचे प्रकार खपवून घेतले जाणार नाहीत.

तसेच बार्शी तालुक्यातील अनेक शिधा पुरवठा पत्रिकाधारकांचे अर्ज प्रलंबित आहेत त्याचप्रमाणे अनेक शिधापत्रिका रद्द झाल्या आहेत. या प्रकारांची योग्य चौकशी होऊन अहवाल तयार करण्याच्या सूचना त्यांनी महसूल प्रशासनाला दिल्या.

ग्रामीण भागातील अंतर्गत रस्ते करताना कमीतकमी क्षेत्र संपादन करत शेतीचे नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी. गावाच्या सार्वजनिक हिताला तडा जाणार नाही याची काळजी घ्यावी असे आवाहन त्यांनी केले.

पुरवठा खात्यामधील कारभाराबाबत नाराजी

महसूल विभागातील पुरवठा खात्यामधील कारभाराबाबत तीव्र नापसंती व्यक्त करत याबाबत आमसभेतून आलेल्या ग्रामस्थांच्या तक्रारी लक्षात येत याबाबत महसूल विभागाची स्वतंत्र बैठक आयोजित करण्याची सूचना आमदार राऊत यांनी यावेळी तहसिलदारांना केली.

सिव्हिल हॉस्पिटल येथून दुचाकी पळवली

सुराज्य/सोलापूर : सिव्हिल हॉस्पिटल येथील उपहारगृहाच्या समोरील पार्क करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एम.एच.१३. बीएल. ४७३८ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे. ही घटना २९ मार्च रोजी सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास घडली. याप्रकरणी हरी श्रीमंत पाटील (वय-५५, रा. मुपो. कर्देळळी) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार मुलाणी हे करीत आहेत.

स्वेरीच्या मैदानावरून आंतरराष्ट्रीय खेळाडू घडतील : मातापूरकर

सुराज्य/पंढरपूर

अलिकडच्या काळात सगळीकडे उत्तम दर्जाच्या मैदानांची कमतरता भासत आहे. शाळा-महाविद्यालये मोठ्या संख्येने आहेत पण विविध क्रीडाप्रकारांसाठी मैदाने नाहीत आणि मैदाने असली तरी ती सुस्थितीत नाहीत. आज स्वेरीचे भव्य क्रीडांगण पाहून मनस्वी आनंद झाला. खेळाडू घडण्यासाठी मैदानाची गरज असते. भविष्यात स्वेरीच्या मैदानावरून नक्कीच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू घडतील, असे प्रतिपादन महाराष्ट्र क्रीडा असोसिएशनचे व चेन्नई सुपर किंग्ज टीममधील उस्मानाबादचे खेळाडू राजवर्धन हंगरगेकर यांचे कोच व बीसीसीआय फिटनेस ट्रेनर तेजस मातापूरकर यांनी केले.

गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या सुसज्ज असलेल्या क्रीडा मैदानाला महाराष्ट्र क्रीडा असोसिएशनचे फिटनेस कोच तेजस मातापूरकर व महाराष्ट्र वुमन्स क्रिकेटर्स असोसिएशनच्या फिटनेस कोच मासुमा मातापूरकर यांनी सदिच्छा भेट दिली, त्यावेळी ते बोलत होते. स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज प्रा. एम. एम. पवार यांनी त्यांचे स्वागत केले.

यावेळी त्यांच्या समवेत छत्रपती क्रिकेट ॲकॅडमीचे अध्यक्ष शिवाजी पाटील, सचिन तांबिले, रवी निंबाळकर, अथर्व पाटील, अपूर्व पाटील तसेच स्वेरीचे प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आदी देखील उपस्थित होते.

पंढरपूर-मंगळवेढा मतदारसंघातील पर्यटनासाठी अडीच कोटी मंजूर

आ. आवताडे यांची माहिती

सुराज्य/पंढरपूर : मंगळवेढा मतदारसंघातील विविध विकास कामांसाठी राज्य पर्यटन विभागाअंतर्गत २ कोटी ५० लाख रुपये निधी मंजूर झाला असून यामधून तलावांचे सुशोभिकरण करण्यात येणार असल्याची माहिती आमदार समाधान आवताडे यांनी दिली आहे.

यावेळी बोलताना आ. आवताडे म्हणाले की, ‘आध्यात्मिक आणि सांप्रदायिक विचारांची वैभवशाली परंपरा असलेल्या या मतदारसंघात विविध पर्यटन स्थळे विकसित करून येथील पर्यटन संकल्पनेला चालना देण्यासाठी व पर्यटन स्थळांची निर्मिती कारण्यासाठी निधीची आवश्यकता होती सदर पर्यटन विकास निधीमुळे दोन्ही शहरामधील पर्यटन स्थळांचा लौकिक वाढविण्यासाठी खूप मोठी मदत होणार आहे. पर्यटन आणि ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेल्या मतदार संघातील विविध ठिकाणांचा विकास करणेकामी निधीसाठी राज्य पर्यटन विभागाशी वेळोवेळी पत्रव्यवहार करून या निधीची मागणी केली होती. या मागणीची दखल घेऊन राज्याचे मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे, ना. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे-पाटील व पर्यटनमंत्री ना. मंगलप्रभात लोढा यांच्या माध्यमातून व सहकार्यातून हा निधी मंजूर झाला असल्याचे आ. आवताडे यांनी आहे.

वंचित गावांना पाणी मिळविण्यासाठी ग्रामस्थांसोबत राहणार : आ. सातपुते

सुराज्य/पिलीव

माळशिरस तालुक्यातील निरा देवधरच्या पाण्यापासून पिढ्यानपिढ्या वंचित असणाऱ्या गावांना पाणी मिळविण्यासाठी आपण ग्रामस्थांसोबत राहणार असल्याचे आमदार रामभाऊ सातपुते यांनी सांगितले. त्यांना बचेरी येथील संघर्ष समितीने निवडणुकीवर बहिष्कार टाकणार असल्याचे पत्र माळशिरस येथील शासकीय विश्रामगृह येथे देण्यात आले.

बचेरी येथील ग्रामस्थ व निरा देवधर संघर्ष समितीने शेतीला पाणी मिळावे यासाठी टोकाचा संघर्ष करण्याचे ठरविले आहे. जोपर्यंत पाणी मिळत नाही तोपर्यंत सर्व निवडणुकांवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय बचेरी गावाने एकमुखाने घेतला आहे. तसेच संघर्ष समितीमार्फत निवडणुकावर बहिष्कार टाकण्याचा जो ठराव हा तो शासन स्तरावर तसेच लोकप्रतिनिधी यामध्ये आमदार, खासदार यांना देण्याचे ठरले होते, त्यानुसार माळशिरस तालुक्याचे आमदार सातपुते यांना माळशिरस हा ठराव देण्यात आला.

यावेळी संघर्ष समितीचे अध्यक्ष शंकर शिकारे, उपाध्यक्ष मच्छिंद्र थिटे, सचिव सोमनाथ गाढवे, कार्याध्यक्ष बिरुदेव शिंदे व सचिन शिकारे, खजिनदार शिवाजी सावळजकर, सरपंच महादेव पाटील, उपसरपंच मोहन शिकारे, प्रसिध्दीप्रमुख प्रा. सदाशिव शिंदे, माजी सरपंच सर्जेराव कोकरे, माजी सरपंच अस्मिता शिंदे, माजी उपसरपंच वामन शिकारे, सुभाष शिकारे, सुदाम शिंदे, श्रीमंत कारंडे, अधिकराव माने, गणेश गोडसे, गणेश देशमुख, विश्वजित गोरड, मिलिंद इनामदार, अमोल काटे, प्रा. शंकर शिंदे आदी उपस्थित होते.

मृत्यूस कारणीभूत; गुन्हा दाखल

सुराज्य/सोलापूर

सोलापूर - पुणे हायवे रोडवरील नेक्सा शोरूमच्या समोर कार भरधाव वेगात येत धडक देऊन सखुबाई मारुती भास्कर (वय-५५, रा. मनोहर नगर झोपडपट्टी) यांच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही घटना दि. २९ मार्च रोजी दुपारी अडीच वाजण्याच्या दरम्यान घडली. अशा आशयाची फिर्याद गोविंद मारुती भास्कर (वय-३१, रा. मु. पो. जामगाव खुर्द, ता. मोहोळ) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात दिली आहे. या घटनेचा पुढील तपास पोसई भोईटे हे करीत आहेत.

लाच प्रकरणातील फरार तलाठी नळे पोलिसांना शरण

सुराज्य/मंगळवेढा : महामार्गासाठी बाधीत झालेल्या पाईपलाईनच्या भरपाईपोटी १ लाख ४३ हजाराचे धनादेश काढून देण्यासाठी ७ हजाराची लाच घेऊन लाचलुचपत पथकांच्या कर्मचाऱ्यास जखमी करुन चार चाकी वाहनातून फरार झालेला तलाठी सुरज नळे यास पोलिसांनी मंगळवेढा-सोलापूर महामार्गावर ताब्यात घेतल्याची माहिती लाचलुचपत पथकाच्या अधिकाऱ्यांनी दिली.

या प्रकरणातील खासगी इसम पंकज चव्हाण (रा शेलेवाडी) यास चार दिवसाची पोलीस कोठडी दिली. या प्रकरणात लाचेची रक्कम स्विकारुन नळे फरार झाली त्याची चार चाकी गाडी कामती जवळ पोलीसांनी ताब्यात घेतली. या लाच प्रकरणाने नेहमी चर्चेत असलेले प्रांत कार्यालय आणखीन चर्चेत आले दरम्यान तलाठी नळे यांच्याकडून या प्रकरणात आणखी कोण सहभागी आहेत का ? हे तपासात समोर येणार आहे.

जप्तीच्या कारवाईतही

दुधनी न. प. ची शिक्षणक्षेत्रासाठी सौहार्दाची भावना

थकीत करापोटी फक्त मुख्याध्यापकांचे कार्यालय सील

सुराज्य/अक्कलकोट

दुधनी शहरातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक मराठी केंद्र शाळा, प्राथमिक कन्नड मुलींची शाळा, प्राथमिक उर्दू शाळा, या शाळांचा मालमत्ता कर सन २०१८-१९ अगोदर पासून मालमत्ता कर थकित असल्याने दुधनी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी अतिश वाळुंज यांच्या मार्गदर्शनाखाली शुक्रवारी सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास दुधनी नगरपरिषदेच्या वसुली पथकाने मुख्याध्यापक कक्षाला सील केले. तथापि मुलांच्या शैक्षणिक सोयीचा विचार करत दुधनी नगरपरिषदेने शिक्षणक्षेत्रासाठी सौहार्दाची भावना दाखवत नगरपरिषद प्रशासनाने सर्व वर्ग खोल्या वगळून फक्त मुख्याध्यापकांचे कार्यालय सील केले आहे.

कर भरण्याबाबत वेळोवेळी शाळा, पंचायत समिती व जिल्हा परिषदेशी संपर्क केला आहे, अशी माहिती मुख्याधिकारी अतिश वाळुंज यांनी दिली. त्यानंतर संतप्त झालेल्या पालकांनी विद्यार्थ्यांसह नगरपरिषद कार्यालय गाठून थोडा वेळ ठिय्या आंदोलन केले.

नगरपरिषदेला शाळेकडून सुमारे ६० लाख रूपयांपेक्षा जास्त कर थकीत असून वारंवार लेखी तोंडी सूचना देऊनही, प्रत्यक्ष भेट घेऊन, फोनवरून सांगून नोटीस देऊनही संबंधित अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल्याने नाइलाजास्तव फक्त मुख्याध्यापक केबिन सील केले असून विद्यार्थ्यांच्या वर्गखोल्या मोकळ्या आहेत. कर भरणा झाल्याशिवाय सील काढणार नसल्याचे दुधनीचे मुख्याधिकारी आतिश वाळुंज यांनी सांगितले. न. प. ने सुमारे चार लाखांपेक्षा जास्त थकबाकी असल्याबद्दल प्राथ. आरोग्य केंद्र येथील वैद्यकीय अधिकारी यांच्या कक्षाला पण सील केले आहे.

लवकर तोडगा निघावा : शटगार

दुधनी येथील उर्दू, मराठी व कन्नड शाळचा मिळुन ६० लाख रूपये पेक्षा जास्त कर थकित आहे. नगरपरिषदेकडून २७ लाख रूपये शिक्षण कर म्हणून शाळेला येणे आहेत. कार्यालय सील केले आहे त्यामुळे अडचणी येत आहेत. घटना वरिष्ठांना कळविले आहे. लवकर यावर तोडगा निघावा. विद्यार्थ्यांच्या बालमनावर याचा विपरीत परिणाम होत आहे, असे केंद्रप्रमुख एस. एच. शटगार यांनी सांगितले.

शिक्षण कर व झेडपीचा काही संबंध नाही : वाळुंज

शिक्षण कर व झेडपीचा काही संबंध नाही. त्यांचा चुकीचा समज आहे. आपण तहसिल ऑफीसला थेट शिक्षण कर वेळोवेळी भरत असतो. त्यांचा याबाबत चुकीचा समज आहे, असे मुख्याधिकारी आतिश वाळुंज यांनी सांगितले.

बारामतीत ज्वेलर्सच्या दुकानावर सशस्त्र दरोडा

ग्रामस्थांवर गोळीबार; एका आरोपीला पकडले, तिघे फरार

सुराज्य/बारामती

पुणे जिल्ह्यात बारामती तालुक्यातील सुपे येथील बाजार मैदानालगत असलेल्या महालक्ष्मी ज्वेलर्स या सराफी दुकानावर दरोडा पडला. पिस्तुलमधून गोळीबार करत शुक्रवारी (दि. ३१) सायंकाळी चार जणांच्या टोळीने लूट केली. या टोळीतील एकाला सतर्क ग्रामस्थांनी ताब्यात घेतले आहे तर अन्य आरोपी फरार झाले आहेत. या घटनेत नेमकी किती लूट झाली, हे समजू शकले नाही. पोलीस व दुकान मालक यांच्याकडून दुकानातून काय काय चोरीला गेले, हे तपासले जात होते.

पोलिसांनी ताब्यात घेतलेला आरोपी स्वत:चे नाव पवन जगदीश बिश्वकर्मा (वय ३० वर्ष, रा. उत्तर प्रदेश) असे सांगत आहे. या घटनेत सागर दत्तात्रय चांदगुंडे, अशोक भागुजी बोरकर, सुशांत क्षीरसागर हे तिघे जखमी झाले आहेत.

सुप्यात बाजार मैदानालगत सुयश सुनील जाधव यांचे महालक्ष्मी ज्वेलर्स हे दुकान आहे. दरोडेखोरांनी ते लुटण्याचा प्रयत्न केला. ग्रामस्थ मदतीला येत असल्याचे पाहून दुकानात गोळीबार करण्यात आला. दरोडेखोर पळून जात असताना ग्रामस्थांनी पकडण्याचा प्रयत्न केला असता पुन्हा गोळीबार केला गेला. यात सागर हे जखमी झाले. दुसऱ्या गोळ्या अशोक बोरकर व सुशांत क्षीरसागर यांच्या पोटाला व पायाला लागल्या.

क्षीरसागर हे दुकानातील कामगार आहेत. दुकान मालक जाधव यांची पत्नीही यावेळी दुकानात उपस्थित होती. त्यांना या घटनेने मोठा धक्का बसला. त्यामुळे या घटनेत नेमकी किती लूट झाली याबद्दल निश्चित माहिती उपलब्ध झाली नाही. जखमींना उपचारार्थ येथील साळुंके हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. यावेळी एक दरोडेखोर ग्रामस्थांच्या हाती लागताच अन्य लोक मोटारीतून पसार झाले.

सुप्यात शुक्रवारी सायंकाळी घडलेल्या या प्रकारामुळे खळबळ उडाली आहे. पोलिसांनी ठिकठिकाणी नाकाबंदी केली असून पसार झालेल्यांच्या शोधार्थ पथके पाठविण्यात आली आहेत. घटनास्थळी अप्पर पोलिस अधिक्षक आनंद भोईटे, उपविभागीय पोलिस अधिकारी गणेश इंगळे, वडगाव निंबाळकर पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक सचिन काळे यांनी तात्काळ भेट दिली.

अल्पवयीन मुलीचा ५० हजारात सौदा

मनसे म्हणाली, 'जिथे गरज पडेल तिथे दांडा नक्की बाहेर काढू'

सुराज्य/पुणे

'तुझ्या मित्राचं लग्न आहे, अशी फूस लावून ४० वर्षीय महिलेने अल्पवयीन मुलीला मध्यप्रदेशला नेले. ५० हजार रुपयांना सौदा करुन तिचे एका अनोळखी व्यक्तीसोबत लग्न लावून दिल्याचा आरोप आहे. लग्नाचे आमिष दाखवून मध्यप्रदेशात विकण्यात आलेल्या अल्पवयीन मुलीला न्याय देण्यासाठी आरोपींशी संबंधित कंपनीला जाब विचारण्यासाठी पुण्यातील मनसे नेते वसंत मोरे गेले होते. परप्रांतीय नागरिकांना कामाला ठेवण्यापूर्वी त्यांची पूर्ण माहिती करून येतली होती का? त्यांचं पोलीस व्हेरिफिकेशन केलं होतं का? असे प्रश्न वसंत मोरेंनी विचारले आहेत. सिक्युरिटीने कंपनीच्या गेटवरुन पीडित मुलीच्या आई-वडिलांना हाकलून दिलं होतं. हा सगळा प्रकार माझ्या भागात घडला आहे, असंही यावेळी वसंत

मोरे म्हणाले. योग्य तो न्याय कुटुंबियांना द्यावा नाही तर मनसे स्टाईल आंदोलन करू', असं मोरे म्हणाले. जिथे गरज पडेल तिथे दांडा नक्की बाहेर काढू, असाही इशारा मोरेंनी दिला आहे.

देशात वाघांची संख्या ३५०० हून अधिक

सुराज्य/चंद्रपूर : भारतातील वाघांसाठी प्रतिष्ठित संवर्धन योजना असलेल्या प्रोजेक्ट टायगरला ५० वर्षे पूर्ण होत आहेत. प्रोजेक्ट टायगरचा पाया १ एप्रिल १९७३ रोजी तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी उत्तराखंडच्या जिम कॉर्बेट प्रकल्पात रचला होता. 'प्रोजेक्ट टायगर'च्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त, देशात प्रथमच ९ ते ११ एप्रिलदरम्यान कर्नाटकातील म्हैसूर येथे आयकॉन (ICCON) भारत संवर्धन परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेचा लोगो प्रसिध्द करण्यात आला आहे.

नोकरी-चाकरी झुगारत स्वीकारला सेंद्रीय शेतीचा मार्ग

शुभम मडावी राबवितोय 'फार्म टू होम' संकल्पना

सुराज्य/नागपूर

आजोबा विद्युत मंडळात, वडील रिझर्व्ह बँक ऑफ इंडियात. घरी वातावरण शिक्षण पूर्ण करून सरकारी नोकरीचे. मात्र, या पठ्ठ्याने हा पारंपरिक नोकरीचा मार्ग झुगारत सेंद्रीय शेतीचा पर्याय स्वीकारला. आजघडीला 'फार्म टू होम' ही संकल्पना साकारात कुठल्याही रासायनिक खतांचा उपयोग न करता पूर्णत: सेंद्रीय पद्धतीने तयार केलेला भाजीपाला घरोघरी पोहचविण्याचे काम हा युवा शेतकरी करत आहे. भविष्यात हाच सेंद्रीय भाजीपाला निर्यात करण्याचे स्वप्न उराशी बाळगून असलेल्या युवा उद्यमीचे नाव आहे शुभम माणिकराव मडावी.

गेल्या काही वर्षांमध्ये सेंद्रीय शेती करणाऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. रासायनिक खतांचा उपयोग न करता पिकविलेला भाजीपाला दररोजच्या जेवणात वापरणाऱ्यांची संख्या वाढली आहे. अगदी घरच्या घरी अंगणात वा टेरेसवर भाजीपाला पिकविणारेदेखील दिसू लागले आहेत. नैसर्गिक, शुध्द आणि रसायनमुक्त खानपानाकडे वळलेला लोकांचा ट्रेंड लक्षात घेत शुभमने सेंद्रीय शेती सुरू केली.

बँचलर ऑफ फायनान्शियल मार्केटचे शिक्षण घेतलेल्या शुभमने सेकंड इअरला असतानाच नोकरी न करण्याचे ठरविले होते. स्वत:चा बिझनेस असावा, हे ध्येय निश्चित

होते. त्यामुळे त्याने सुरुवातीला ट्रान्सपोर्टचा बिझनेस सुरू केला. तो अजूनही सुरू आहे. दरम्यानच्या काळात लाखनीजवळील वडिलोपार्जित शेतीवर त्याने सेंद्रीय शेतीचा प्रयोग सुरू केला.

पहिल्या टप्प्यात त्याने अर्धा एकर जागेवर वांगी, टोमॅटो, मिरचीचे पीक घेतले. तर अर्ध्या एकरमध्ये टरबूज, खरबूज आणि काकडी लावली. पण, या प्रयोगात अपयश हाती लागले. त्यातून धडा घेत पुढल्या वेळी वांगी, मिरची, टोमॅटो, काकडी, लवकी, कारले, दोडके, भेंडी, पालक, मेथी, लाल भाजी, चवळी भाजी, कोथिंबीर लावले. मुख्य म्हणजे दुसऱ्याच प्रयोगात या सर्व पिकांचे चांगले उत्पादन आले.

वादग्रस्त बोटीत आढळले पाकिस्तानी नागरिक

सुराज्य/पालघर

पालघरमधील समुद्र किनाऱ्याजवळ संशयास्पद बोट आढळल्याची धक्कादायक बातमी समोर येत आहे. शनिवारी सकाळच्या सुमारास ही बोट आढळली. विशेष म्हणजे या बोटीत पाकिस्तानी नागरिक असल्याची माहिती मिळते. पालघरपासून ४४ नॉटिकल मैल अंतरावर ही बोट आढळली.

मिळालेल्या माहितीनुसार, 'जलराणी' असे या बोटीचे नाव असल्याचे समजते. तसेच, या बोटीची नोंदणीही झालेली आहे. या बोटीत एकूण १५ जण सापडली होती. त्यामधील दोनजण पाकिस्तानी नागरिक असल्याची माहिती मिळाली. तसेच, १३ जण भारतीय नागरिक असल्याचे समजते. या सर्व नागरिकांची सध्या तपासणी केली जात आहे. या बोटीत दोन पाकिस्तानी नागरिक असल्याची माहिती मिळताच सगळ्या यंत्रणा सक्रीय झाल्या आहेत.

तांबेंना आता मामांकडूनही 'ग्रीन सिग्नल'

थोरातांनी नवी भूमिका मांडल्याने चर्चांना उधाण

सुराज्य/अहमदनगर

विधानपरिषदेच्या नाशिक पदवीधर मतदारसंघातील अपक्ष उमेदवार सत्यजित तांबे यांना पुन्हा काँग्रेस प्रवेशाचे निमंत्रण देणारे त्यांचे मामा आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी नवी भूमिका मांडली आहे. सत्यजित अपक्ष आहेत. अपक्षाला कोणताही पक्ष नसतो. त्यामुळे इतर पक्षांच्या नेत्यांसोबत कुठे भेट देणे अगर इतर निर्णय घेण्याचे त्यांना स्वातंत्र आहे,' असं थोरात यांनी पत्रकारांच्या एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितलं. त्यामुळे आमदार तांबे पुन्हा काँग्रेसमध्ये

येणार का? त्यांना पक्षात घेतले जाणार का? हे प्रश्न पुन्हा अनुत्तरित राहिले आहेत. तसंच मी यापुढे पक्षविरहित राहणार, या सत्यजीत तांबेंनी घेतलेल्या भूमिकेला थोरात यांनी ग्रीन सिग्नल दिल्याच्याही चर्चांनी जोर धरला आहे.

पोलिसांशी धुमश्चक्री; एक नक्षलवादी ठार

सुराज्य/गडचिरोली: भामरागड तालुक्यातील कियरकोटी अबुझमाड जंगल परिसरात शनिवारी सकाळी १० वाजल्यापासून पोलीस नक्षलवाद्यांमध्ये चकमक सुरू असून, यात एका नक्षलवाद्याला ठार करण्यात पोलिसांना यश आले. सोबतच मोठ्या प्रमाणात नक्षलसाहित्य व शस्त्रसाठा जप्त करण्यात आल्याची माहिती पोलीस सूत्रांनी दिली.

मी गृहमंत्री झाल्याने अनेकांची अडचण

सुप्रिया सुळेंच्या टीकाला देवेंद्र फडणवीसांचे प्रत्युत्तर

सुराज्य/नागपूर: खासदार संजय राऊत यांना धमकी देणाऱ्या व्यक्तींची ओळख पटली असल्याची प्राथमिक माहिती आहे. त्याला ताब्यात घेण्यात आले असल्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूरमध्ये माध्यमांशी बोलताना सांगितले आहे.

मी गृहमंत्री झाल्याने अनेकांची अडचण झाली आहे. मात्र बेकायदेशीर कृत्य करणाऱ्या कोणालाही

सोडणार नाही, असे प्रत्युत्तर देवेंद्र फडणवीसांनी खासदार सुळेंचे नाव न घेता दिले आहे.

फडणवीस म्हणाले, 'संजय राऊत यांना धमकीचा मेसेज करणाऱ्या व्यक्तींची ओळख पटली आहे. प्राथमिक माहिती अशी आहे की दारुच्या नशेत त्याने धमकी दिली. त्याला पुणे पोलिसांनी आयडेंटीफाय केले असून ताब्यात घेतले आहे. महाराष्ट्रात कोणी कोणालाही धमकी दिली तरी, सरकार आणि पोलीस शांत बसणार नाही. कायदा कडक काम करेल.'

सर्वसामान्यांच्या खिशाला कात्री

वीजदरात आजपासून वाढ

सुराज्य/मुंबई

दरवर्षी १ एप्रिलपासून नव्या आर्थिक वर्षाची सुरूवात होते. नव्या आर्थिक वर्षात नवे दर जारी होत असतात, तर काही दरांची घटही होत असते. परंतु, या नवीन आर्थिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी सर्वसामान्य नागरिकांना शॉक बसला आहे. कारण शनिवारपासून वीज दर महाग झाले आहेत. वीज दरात ५ ते १० टक्के वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे आता दर महिन्याला त्यांना वीज वापरासाठी अधिक शुल्क भरावे लागणार आहे. आर्थिक वर्ष २०२३-२४ आणि आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी दर वाढ करण्यात आली आहे.

महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने (MERC) १ एप्रिल २०२३ पासून नवीन दर लागू केले आहेत. वीज वितरणच्या प्रामुख्याने ४ कंपन्या आहेत. MSEDCL म्हणजेच महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लिमिटेड राज्य सरकारद्वारे चालवली जाते. ही महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाची उपकंपनी आहे. शिवाय टाटा पॉवर आणि अदानी इलेक्ट्रिसिटी खाजगी क्षेत्रातही वीज वितरण करतात.



मुंबईत बेस्टकडून प्रामुख्याने वीजपुरवठा केला जातो.

गौतम अदानींच्या अडचणी वाढल्या

आता सेबी ॲक्शन मोडमध्ये

सुराज्य/नवी दिल्ली

उद्योगपती गौतम अदानी यांचे 'दु:ख' अजूनही संपण्याचे नाव घेत नाहीये. आधी हिंडेनबर्ग रिसर्चचा अहवाल, मग कर्ज फेडण्याचा दबाव आणि त्यानंतर 'द केन'चा अहवाल हे सगळे कसेतरी शांत झाले होते की आता बाजार नियामक सेबीने अदानी समूहाच्या विदेशी सौद्यांची चौकशी करण्याचा निर्णय घेतला आहे. नवीन वर्षाच्या सुरुवातीलाच आलेल्या हिंडेनबर्गच्या अहवालानंतर सुरू झालेल्या गौतम अदानी यांच्या अडचणी दिवसेंदिवस वाढतच जात आहेत. आता मार्केट नियामक सेबीने अदानी समूहाच्या परदेशी कंपन्यांसोबत केलेल्या काही व्यवहारांची चौकशी करण्याचा निर्णय घेतला आहे, जेणेकरून नियमांचे संभाव्य उल्लंघनाचा शोध घेतला जाऊ शकेल.

ईटीने या प्रकरणाची माहिती असलेल्या सूत्रांचा हवाला देत सांगितले की, सेबी आता अदानी समूहाच्या किमान तीन विदेशी कंपन्यांसोबतच्या व्यवहारांची चौकशी करणार असून अदानी समूहाने केलेल्या 'संबंधित पक्ष व्यवहारां'मध्ये नियमांचे उल्लंघन होत नाही? याची तपासणी करेल. या व्यवहारांमध्ये 'रिलेट पार्टी' व्यवहाराच्या नियमांचे उल्लंघन झाल्याचा सेबीला संशय आहे.

विनोद अदानींशी संबंधित आहे कंपन्या?

सूत्रांच्या हवाल्याने अहवालात म्हटले की, तीन संस्थांनी गेल्या १३१ वर्षांत अब्जाधीश गौतम अदानी यांनी स्थापन केलेल्या पोर्ट-टू-पॉवर समूहाच्या असूचीबद्ध युनिट्ससह अनेक गुंतवणूक व्यवहार केले आहेत. तसेच गौतम अदानी यांचा भाऊ विनोद अदानी यांचा देखील या ऑफशोअर संस्थांशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संबंध असू शकतो, असेही सूत्रांनी सांगितले. विनोद अदानी एकतर कंपनीचे फायदेशीर मालक, डायरेक्टर किंवा त्यांचा त्यांच्याशी काही संबंध असेल. हे उघड न करणे हे 'संबंधित पक्ष व्यवहार' नियमांचे उल्लंघन आहे का, याची तपासणी सेबी करत आहे.

अलीकडेच अदानी समूहाने अंबुजा सिमेंट आणि एसीसी लिमिटेड हे विनोद अदानी यांच्या कंपन्यांनी विकत घेतले असल्याचे उघड केले होते. याशिवाय विनोद अदानी हे अदानी ग्रुपच्या प्रमोटर्स ग्रुपचा एक भाग आहेत, असेही अदानी ग्रुपकडून सांगण्यात आले.

कायदा काय सांगतो?

भारतीय कायद्यांतर्गत जवळचे नातेवाईक, प्रवर्तक गट आणि सूचीबद्ध कंपन्यांचे उपकंपनी संबंधित पक्ष मानले जातात. प्रवर्तक गटाची व्याख्या एक संस्था म्हणून केली जाते, ज्याचा सूचीबद्ध कंपनीमध्ये बहुसंख्य हिस्सा असतो आणि कंपनीच्या धोरणावर प्रभाव टाकू शकतो. अशा संस्थांमधील व्यवहार नियामक आणि सार्वजनिक फाइलिंगमध्ये उघड केले जाणे आवश्यक आहे आणि एका विनिर्दिष्ट मर्यादेपेक्षा जास्त भागधारकांची मंजुरी देखील आवश्यक आहे. सामान्यतः नियमाचे उल्लंघन झाल्यास दंडात्मक कारवाई केली जाते.

'संबंधित पक्ष व्यवहार' म्हणजे काय?

भारतीय कायद्यानुसार जर एखाद्या सूचीबद्ध कंपनीने स्वत:ची उपकंपनी, प्रवर्तक गटातील कंपनी, नातेवाईक इत्यादींसोबत व्यवहार केला तर त्याला संबंधित पक्ष व्यवहार म्हणतात.

हिंडेनबर्गचा अहवाल

लक्षात घ्या की हिंडेनबर्गच्या अहवालांत देखील वारंवार विनोद अदानींचा उल्लेख करण्यात आला आहे. अदानी समूहाने विनोद अदानी यांच्याशी असलेले संबंध जाणूनबुजून लपवल्याचे अहवालात म्हटले असून विनोद अदानींच्या कंपन्यांनी सौद्यांचे 'संबंधित पक्ष' स्वरूपाचे आवश्यक खुलासे न करता अदानींच्या सार्वजनिकरित्या सूचीबद्ध आणि खाजगी संस्थांना एकत्रितपणे अब्जावधी डॉलर्स हस्तांतरित केल्याचा आरोपही हिंडेनबर्गने केला.

'अमृत'पालातील विष भिंद्रनवाले 2.0

अवघ्या २९ वर्षीय अमृतपाल सिंग स्वत:ला खलिस्तान समर्थक म्हणून सांगतो. मागच्या वर्षी शेतकरी आंदोलनादरम्यान लाल किल्ल्यावर दीपसिंग सिध्दू याने स्वतंत्र खलिस्तानचा झेंडा फडकवला. पुढे तो रस्ते अपघातात मरण पावला. हा अपघात नसून घातपात असल्याचा संशय आहे. सिध्दूची 'वारीस पंजाब दे' ही संघटनाच ताब्यात घेऊन अमृतपाल सिंग खलिस्तानची मागणी करत आहे. सध्या तो फरार आहे. त्याच्यामुळेच ऑपरेशन ब्ल्यू स्टारनंतर मंदावलेल्या खलिस्तानी चळवळीने जोर धरला आहे. त्याने काही दिवसांपूर्वीच पंजाबमधील अजनाल पोलीस ठाण्यावर ग्रेनेड हल्ला केला आहे. त्यानंतर लंडन आणि कॅनडातही खलिस्तानी चळवळीने डोके वर काढल्याचे दिसत आहे. त्यामुळे अमृतपालला 'भिंद्रनवाले २.०' असे संबोधले जात आहे.

स्वतंत्र खलिस्तानची मागणी करत नावात अमृत असले तरी कृतीतून विष ओकणाऱ्या अमृतपालने सध्या पंजाबमध्ये धुमाकूळ घातला आहे. स्वत:ला प्रचंड धर्माभिमानी आणि जर्नलसिंग भिंद्रनवाले यांचा कट्टर अनुयायी समजणाऱ्या अमृतपालने पुन्हा एकदा स्वतंत्र खलिस्तानची मागणी पुढे रेटली आहे. त्यासाठी अत्यंत आक्रमक आणि तितकीच हिंसक 'वारीस पंजाब दे' नावाची संघटना तयार केली आहे. काही महिन्यांपूर्वी या संघटनेने पंजाबमधील एका पोलीस ठाण्यावरच हल्ला करून आपल्या आक्रमकतेची चुणूक दाखवली होती. तेव्हाच हा विषारी किडा खुडून काढला असता तर आज तो पंजाबची डोकेदुखी ठरला नसता. मात्र त्याच्या कारवायांमुळे एकेकाळी देशाची डोकेदुखी बनलेली खलिस्तानी चळवळ पुन्हा एकदा पंजाबमध्ये वळवळ करत असल्याचे पुढे आले आहे. त्यास अनुसरून खलिस्तानी चळवळ नेमकी आहे तरी काय? ती कधी सुरू झाली? आता पुन्हा ती चळवळ का सुरू झाली? अशा अनेक प्रश्नांची सोडवणूक करून देणारा लेखनप्रपंच आजच्या 'संडे मॉर्निंग'मधून खास 'सुराज्य'च्या वाचकांसाठी.

स्वतंत्र खलिस्तानची आक्रमक मागणी करणारा जर्नलसिंग भिंद्रनवाले हा कट्टर धर्मवेडा होता. तो धर्माच्या डोहात आकंठ बुडालेला होता. पण स्वत:ला भिंद्रनवालेचा अनुयायी समजणारा अमृतपाल हा तसा भुरटा. तो धर्माभिमानी किंवा धर्मवेडा वगैरे असे काही नाही. तो काही महिन्यांपूर्वीपर्यंत दुबईमध्ये पडेल ती कामे करून गुजराण करणारा सामान्य माणूस. त्यावेळी तो अंगावर शीख धर्माची प्रतिकेसुध्दा वापरत नव्हता. पण वेगळे काही अचाट करून दाखवण्याचे भूत त्याच्या मानगुटीवर बसले आणि अचानक त्याच्या अंगात भिंद्रनवाले शिरला आणि तो अमृतपाल झाला. त्यानंतर त्याने सप्टेंबर महिन्यात शीख धर्माची संथा घेतली. तिथून तो स्वतंत्र खलिस्तानचा फूत्कार सोडू लागला.

खलिस्तान म्हणजे काय?

खलिस्तान हे शिखांच्या काल्पनिक देशाचे नाव आहे. पंजाबी भाषेतील 'खालसा' या शब्दावरून खलिस्तान हे नाव पुढे आले. खलिस्तान म्हणजे 'खालसाची भूमी' असा अर्थ सांगितला जातो. अर्थात शीख धर्मीयांचा स्वतंत्र देश म्हणजे खलिस्तान. याच स्वतंत्र खलिस्तानसाठी पंजाबमध्ये जी चळवळ उभी राहिली, त्या चळवळीला खलिस्तानी चळवळ असे म्हटले जाते. १९७० ते १९८० या काळात पंजाबमध्ये शीख समुदायाचा एक स्वतंत्र देश निर्माण करण्यासाठी ही चळवळ सुरू करण्यात आली होती.

खलिस्तान चळवळीची पार्श्वभूमी

दि.३१ डिसेंबर १९२९ रोजी लाहोरमध्ये काँग्रेसचे राष्ट्रीय अधिवेशन भरले होते. या अधिवेशनात मोतीलाल नेहरूंनी संपूर्ण स्वराज्याची मागणी केली होती. या मागणीला बॅ.महम्मद अली जिना यांची मुस्लीम लीग, डॉ. भीमराव आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालील गट आणि मास्टर तारासिंह यांचा शिरोमणी अकाली दल या देशातील तीन गटांनी विरोध केला होता. शिखांसाठी स्वतंत्र देश असावा; अशी तारासिंग यांची मागणी होती. दि.१५ ऑगस्ट १९४७ रोजी हिंदुस्तान स्वतंत्र झाला. पण देशाला स्वातंत्र्य देत असताना इंग्रजांनी देशाची फाळणी केली. त्या फाळणीतून पाकिस्तान हा स्वतंत्र देश निर्माण झाला. त्यावेळी अखंड असणाऱ्या पंजाबचे दोन तुकडे झाले. एक तुकडा पाकिस्तानमध्ये गेला आणि दुसरा तुकडा भारतात राहिला. काही शीख धर्मीय पाकिस्तानातच राहिले. काहींना स्वत:चे घरदार, जमीनजुमला सोडून भारतात यावे लागले. रक्ताच्या नात्यातील काहींची कायमचीच ताटातूट झाली. फाळणीचा हा प्रकार शीख धर्मीयांना अजिबात रुचला नाही. त्यातूनच शीख धर्मीयांच्या स्वतंत्र देशाची म्हणजेच खलिस्तानची मागणी पुढे आली. या मागणीने पुढे देशात दहशतवादाचे रूप धारण केले. पंतप्रधान इंदिरा गांधी, पंजाचबचे मुख्यमंत्री बिअंतसिंग, जनरल अरूणकुमार वैद्य यासारख्या अनेक महत्त्वाच्या अस्तींचे त्यात बळी गेले. या मागणीने जणू देशाविरुध्द युध्दच पुकारले.

खलिस्तानची मागणीची कारणे

१.स्वतंत्र पाकिस्तानची निर्मिती करताना पंजाबमधील काही भाग हा पाकिस्तानात गेला. त्या भागात पंजाबमधील लोकांच्या पूर्वजांच्या जमिनी होत्या.

२. आपल्या पूर्वजांच्या वाडवडिलांनी आपल्यासाठी ठेवून गेलेल्या जमिनी असलेला भाग पाकिस्तान देशात गेल्यामुळे काही शिखांनी पाकिस्तान देशातच वास्तव करायचे ठरवले. त्यामुळे शीख बांधवांची ताटातूट झाली.

३. फाळणीचे तत्त्व न पटल्यामुळे निर्माण झालेला राग, असंतोष आणि नाराजी यामधून स्वतंत्र खलिस्तानची मागणी पुढे आली.

ऑपरेशन ब्ल्यू स्टार सुरू

भिंद्रनवाले याला संपवणे आता आवश्यक बनले होते. त्यासाठी इंदिरा गांधी यांनी १९८४ मध्ये ऑपरेशन ब्ल्यू स्टार करण्याचे आदेश भारतीय लष्काराला दिले. १ जूनपासून लष्कराने सुवर्ण मंदिराला वेढा घातला. रेल्वे गाड्या जागेवरच थांबवण्यात आल्या. बससेवा बंद करण्यात आली. फोन कनेक्शन तोडले गेले. विदेशी माध्यमांना राज्य सोडण्याच्या सूचना दिल्या गेल्या. दि.३ जून १९८४ रोजी पंजाबमध्ये संचारबंदी लावण्यात आली. ४ जूनच्या संध्याकाळी लष्कराने गोळीबार सुरू केला. सैन्याची चिलखती वाहने आणि रणगाडेही दुसऱ्या दिवशी सुवर्ण मंदिरात पोहोचली. भयंकर रक्तपात झाला. दि. ६ जून रोजी भिंद्रनवाले याला लष्कराने कंठस्नान घातले. या कारवाईत ८३ जवान शहीद तर २४९ जखमी झाले. त्याच वेळी, ४९३ अतिरेकी किंवा नागरिक मारले गेले आणि ८६ लोक जखमी झाले. १५९२ लोकांना अटक करण्यात आली.

पंजाबी सुभा आंदोलन

देशाच्या स्वातंत्र्यानंतर स्वतंत्र खलिस्तानच्या मागणीसाठी १९४७ साली पंजाबमध्ये 'पंजाबी सुबा आंदोलन' सुरू झाले. तब्बल १९ वर्षे हे आंदोलन चालले. अखेर १९६६ मध्ये इंदिरा गांधींनी ही मागणी मान्य केली. इंदिरा गांधी सरकारने पंजाबचे तीन भाग केले. पंजाब शिखांसाठी, हरियाणा हा हिंदी भाषिकांसाठी आणि चंदीगड हा तिसरा भाग होता. त्यावेळी चंदीगडला पंजाब आणि हरियाणा या दोन्ही देशांची राजधानी बनवण्यात आली होती. आजही पंजाब आणि हरियाणामध्ये राजधानीबाबत वाद सुरू आहे.

जगजीत सिंह चौहान

पंजाबमध्ये १९६९ मध्ये विधानसभेच्या निवडणुका झाल्या. त्यात स्वतंत्र खलिस्तानवादी जगजीत सिंह चौहान हे तांडा विधानसभा मतदारसंघातून या निवडणुकीत उभे होते. मात्र त्यांचा पराभव झाला. निवडणूक हरल्यानंतर जगजीत सिंह चौहान ब्रिटनमध्ये गेले आणि त्यांनी तेथे त्यांनी खलिस्तान चळवळ सुरू केली. १९७१ मध्ये जगजीत सिंग चौहान यांनी न्यूयॉर्क टाइम्समध्ये खलिस्तान चळवळीसाठी निधी देण्याची मागणी करणारी जाहिरातही दिली होती. जगजीत सिंग १९७७ मध्ये भारतात परतले आणि १९७९ मध्ये पुन्हा ब्रिटनला गेले. येथे जाऊन त्यांनी 'खलिस्तान नॅशनल कौन्सिल'ची स्थापना केली.

जर्नलसिंग भिंद्रनवाले

दि. १३ एप्रिल १९७८ रोजी अकाली कार्यकर्ते आणि निरंकारी यांच्यात झालेल्या हिंसक संघर्षात १३ अकाली कार्यकर्त्यांचा मृत्यू झाला. यानंतर फ्युरी डे साजरा करण्यात आला. त्यात जर्नलसिंग भिंद्रनवाले यांनी भाग घेतला. पंजाब आणि शिखांच्या मागणीवर भिंद्रनवाले यांनी कठोर भूमिका घेतली. त्यांनी ठिकठिकाणी प्रक्षोभक भाषणे देण्यास सुरुवात केली. यावरून पंजाबमध्ये हिंसक घटना वाढल्या. १९८१ मध्ये पंजाब केसरीचे संस्थापक आणि संपादक लाला जगत नारायण यांची हत्या झाली. एप्रिल १९८३ मध्ये पंजाबचे पोलीस उपमहानिरीक्षक ए.एस. आटवाल यांना गोळ्या घालून ठार करण्यात आले. याच काळात पंजाब रोडवेजच्या बसमधील अनेक हिंदूंना मारण्यात आले. पंजाब अशांत झाल्यामुळे पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी पंजाबमधील काँग्रेस सरकार बरखास्त करून राष्ट्रपती राजवट लावली. या काळात या हिंसाचाराला जबाबदार असणारा भिंद्रनवाले अमृतसरच्या सुवर्णमंदिरात ठाण मांडून बसला. शिखांच्या पवित्र सुवर्ण मंदिरालाच त्याने हिंसक आंदोलनाचे केंद्र बनवले.

इंदिरा गांधीची हत्या

ऑपरेशन ब्ल्यू स्टारचा देशात विपरीत परिणाम झाला. शीख समाजात असंतोष पसरला. देशात ठिकठिकाणी केंद्र सरकारचा निषेध सुरू झाला. कॅप्टन अमरिंदर सिंग यांच्यासह अनेक काँग्रेस नेत्यांनी राजीनामे दिले. भिंद्रनवाले संपला तरी पंजाबमधील परिस्थिती निवळली नाही. किंबहुना बिघडली. या ऑपरेशननंतर चारच महिन्यांनी म्हणजे दि.३१ ऑक्टोबर १९८४ रोजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांची त्यांचेच शीख अंगरक्षक असणारे सतवंत सिंग आणि बेअंत सिंग यांनी हत्या केली. त्यांच्या शरीरावर असंख्य गोळ्या झाडून शरीराची चाळण केली.इंदिरा गांधींच्या हत्येनंतर देशभरात शीखविरोधी दंगली उसळल्या. दिल्लीत तब्बल २७३३ शिखांची हत्या शिरकाण करण्यात आली. देशभरात ३,३५० पेक्षा अधिक शिखांची कत्तल करण्यात आली.

वैद्य यांची हत्या, मुख्यमंत्र्यांना उडवले

१० ऑगस्ट १९८६ रोजी ऑपरेशन ब्ल्यू स्टारचे नेतृत्व करणारे माजी लष्करप्रमुख जनरल अरूणकुमार वैद्य यांची पुण्यात हत्या करण्यात आली. खलिस्तान कमांडो फोर्सने याची जबाबदारी घेतली. ३१ ऑगस्ट १९९५ रोजी पंजाबचे मुख्यमंत्री बेअंत सिंग यांच्या कारसमोर एका आत्मघाती बॉम्बरने स्वत:ला उडवले. यामध्ये बेअंत सिंग यांचा मृत्यू झाला.

भिंद्रनवालेच्या हत्येचा बदला

दि. २३ जून १९८५ रोजी मॉन्ट्रियल, कॅनडातून लंडनला जाणाऱ्या एअर इंडियाचे विमान हवेत असतानाच अचानक स्फोट झाला. विमानातील सर्व ३२९ प्रवासी आणि क्रू मेंबर्सचा मृत्यू झाला. सुरुवातीला हा अपघात असल्याचे जाहीर करण्यात आले. मात्र काही दिवसांनी बब्बर खालसा या संघटनेने या हल्ल्याची जबाबदारी घेतली. भिंद्रनवालेच्या हत्येचा बदला घेतला असे बब्बर खालसाने त्यावेळी सांगितले.

पेटता पंजाब

पंजाबमधील वाढत्या हिंसक घटनांसाठी भिंद्रनवालेला जबाबदार धरण्यात आले होते. मात्र, त्याच्याविरुद्ध अपुऱ्या पुराव्यामुळे अटक होऊ शकली नाही. पंजाबमधील वाढत्या हिंसक घटना रोखण्यासाठी भिंद्रनवाले यांना अटक करणे अत्यंत गरजेचे होते. त्यासाठी इंदिरा गांधींच्या सरकारने 'ऑपरेशन ब्ल्यू स्टार' सुरू केले. या ऑपरेशनचे लष्करी कमांडर मेजर जनरल के.एस. ब्रार यांचा विश्वास होता की, काही दिवसांत खलिस्तानची घोषणा होणार होती आणि ती थांबवण्यासाठी ही कारवाई लवकरात लवकर पार पाडणे आवश्यक होते.

आनंदपूर साहिब ठराव मंजूर

१९६६ मध्ये इंदिरा गांधींच्या सरकारने शिखांसाठी वेगळे राज्य केले. त्यामुळे पंजाबमध्ये काही वर्षे शांतता होती, पण १९७३ मध्ये अकाली दलाने पंजाबला अधिक अधिकार देण्याची मागणी मांडली. प्रथम १९७३ मध्ये आणि नंतर १९७८ मध्ये अकाली दलाने पंजाबला अधिक अधिकार देण्यासंदर्भातील ठराव आनंदपूर साहिब ठराव पास केला. केंद्र सरकारला केवळ संरक्षण, परराष्ट्र धोरण, दळणवळण आणि चलन यावर अधिकार असावेत, इतर सर्व बाबींवर राज्य सरकारचा अधिकार असावा, अशी सूचना या ठरावात करण्यात आली. या ठरावात पंजाबला अधिक स्वायत्तता म्हणजेच अधिक अधिकार द्यावेत, असे म्हटले होते. यात वेगळ्या देशाची चर्चा नव्हती.

संकलन व संपादन : राजकुमार नरुटे | मांडणी व सजावट : अभिषेक उघडे